मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

एप्रिल – मे १९७७





तपासले
१९९६

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

नवीन कार्यकारी मंडळ
१९७७ ते १९८०

अध्यक्ष –	डॉ. मधुकर रघुनाथ आष्टीकर
उपाध्यक्ष –	श्री. आ. रा. देशपांडे, नागपूर
	श्री. ब. ना. एकबोटे, यवतमाळ
सरचिटणीस –	श्री. गो. स. देहाडराय
चिटणीस –	प्रा. ज. रा. फणसाळकर, नागपूर
	श्री. प्र. भा. खेळकर, अकोला
	प्रा. शांताराम सीताराम कवडे, वणी
कोषाध्यक्ष –	श्री. अ. ल. लिमये
संपादक, युगवाणी –	डॉ. वि. बा. प्रभुदेसाई
संचालक, परीक्षा समिती –	प्रा. माणिक केशवराव बैतुले
सभासद –	श्री. मनोहर त्र्यंबक म्हैसाळकर
	प्रा. बजरंग शामराव सरोदे, अकोट
	प्रा. पु. ह. धनकर, चंद्रपूर
	प्रा. पंढरीनाथ द. मांडवगणे, अकोला
	डॉ. तु. वि. गेडाम
	प्रा. शिरीष गोपाळ देशपांडे
	श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी
	सौ. कमल आंबेकर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विभव सरस्वतीजन्मभूः

एप्रिल – मे १९७७
वैशाख – ज्येष्ठ शके १८९९
संपादक : वि. वा. प्रभुदेसाई
सहसंपादक : शिरीष गोपाळ देशपांडे

युगवाणी

मूल्य तीन रुपये

वर्ष ३३ अंक १–२

विदर्भ साहित्य संघ ... ग्रंथ मंदिर

समाधान

माझ्या संपादकत्वाखाली निघणारा हा शेवटला अंक. मला संपूर्ण महाराष्ट्रातल्या लेखकांचं सहाय्य सतत मिळालं. अनेक रसिकांची उत्तम संपादनाबद्दल लेखी रसिकदादहि मिळाली. 'युगवाणी' रसिकांना तोषवून गेली. समाधान वाटलं. हे समाधान घेऊन आज मी संपादकीय लिहीत आहे, – एकाच ओळीडे—

" धन्याचा हा माल – मी तो भारवाहू "

— आभारी आहे सर्वांचा, लेखकांचा, कवींचा, रसिकांचा आणि मुद्रकांचा.

चांदणे हरवले !

'श्री. राजाभाऊ बढे निवर्तले !' बातमी आली. क्षणभर चांदणे हरवल्याचीच तीव्र निराशा मनाला अंधारून गेली. विदर्भाच्या मातीचा राजाभाऊंच्या चांदणी मनाला विलक्षण ओढा. शृङ्गार आणि हास्य या रसांनी भिजलेली त्यांची 'विदर्भवाणी' रसिकांना सतत वेड लावत आली आहे. राजाभाऊंचं भावविश्व भोळं भाबडं. 'तिकडली ओढ', 'माहेरची ओढ' 'मीलनाची सलज्ज ओढ' – राजाभाऊंना हे सगळं रसरसत्या जांभुळी शब्दांनी साकार करण्याची ओढ !

वैफल्य, नैराश्य किंवा विद्रोह त्यांच्या सावलीलाहि उभा राहिला नाही कधी. नेहमी उमेद, उमंग आणि ऊज्ज्वल भवितव्याचीच गीते गायिली राजाभाऊंनी. चांदण्याची गाणी गायचा अपार मोह ह्या कवीला. 'चांदणं शिंपडायचं' ही कल्पनाच केवढी हळुवार पण भव्य ! भारदस्त पण भावनेला भिडणारे शब्द आणि त्यातून मस्कती अनारासारखे तडकून फुटणारे 'आरक्त अर्थ' राजाभाऊंच्या काव्यात, मैत्रीचा चिरयौवनी कलात्मक रंग ढंगदारपणे भरून जातात.

राजाभाऊंचे काव्य गेय आहे; ओठावर सदा नाचणारे आहे ऐकणाऱ्याच्याहि ! त्यांच्या काव्याच्या ध्वनिमुद्रिका अनेक निघाल्या पण संग्रह मात्र एकुलता एक, आणि तोहि एका वैदर्भीयानेच काढलेला आणि केवळ भक्तिभावनेनेच ! राजाभाऊंचं व्यक्तिमत्व प्रसन्न ! चालणे बोलणे अगदी चांदणे शिंपीत जाणारंच; आणि म्हणूनच राजाभाऊ गेले आणि क्षणभर चांदणं हरवलंच मराठी अंगणांत !

विदर्भ साहित्य संघातर्फे राजाभाऊंना ही विनम्र श्रद्धाञ्जली !

—मधुकर आष्टीकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक – मंडळ : डॉ. सुरेश डोळके, प्रा. श्रीधर शनवारे, डॉ. सुनील सुभेदार. प्रा. बजरंग सरोदे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. म. बा. कुंडले,

अंतरंग

तीन कथा

चार लेख

एक ग्रंथ परीक्षण

अकरा कविता

याशिवाय रसिक पत्र, कार्यवृत्त, त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल.

विदर्भ साहित्य संघाच्या वार्षिक साधारण सभेची सूचना मलपृष्ठ ३ वर पाहावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उद्या...!

श्यामकान्त कुलकर्णी

हमरस्त्यावरून उजव्या हाताला फुटणाऱ्या रस्त्याला वळले की रस्ता पुन्हा डावीकडे वळतो. पंधरा वीस पावले पुढे चालत गेले की तिथे शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी बांधलेल्या पेशवेकालीन इमारती अजून रांगेत दाटीने उभ्या आहेत. त्यांच्या गर्दीत ती लहान टुमदार बंगली अद्याप उभी आहे. गावठाणातल्या या वस्तीत ती बिलकुल शोभत नाही. विसंगत दिसते. आता त्या बंगलीवर दर्शनी भिंतीवर उजव्या कोपऱ्यात, आठफूट उंचीवर सरांच्या नावाचा बोर्ड नाही. पूर्वी तो बोर्ड त्या जागी दिमाखात उभा असायचा. "डॉ. सी. एस्. वाकनीस, M. D. MRCP, कन्सल्टिंग फिजिशयन्स."

पूर्वी गॅरेजमध्ये सरांची गाडी उभी असे तिथे आता एकदोन लेथ दिसतात. गॅरेज सदोदित उघडे दिसते ड्रिलींग मशीन घरघरत असते आक्सीॲसिटिलीन ज्योत भडभडत असते. हातात काळ्या काचा लावलेले शिल्ड घेऊन, मळकट निळा गणवेश घातलेले कामगार काम करीत असतात. जिथे सर बसायचे, पेशंट बघायचे तिथे काय असते कोणास ठाऊक ! कोणा संसारी गृहस्थाश्रमीचा दिवाणखाना सोफासेट, अलमारी क्युरिओनी भरलेल्या काचेच्या शोकेसेस की एखाद्या इंजिनिअरिंग कंपनीचे ऑफीस ? मी शोधायच्या फंदात पडत नाही. ही बंगली या परिसरात आजही शोभत नाही. तेव्हाही शोभत नव्हती.

इथून जेव्हा जेव्हा मी जातो तेव्हा तेव्हा नजरेसमोर सरांची धीर गंभीर मूर्ती उभी राहते. पावणेपाच फूट उंचीची स्थूल अंगकाठी, शरीर भरलेले, थोडे आडवेच, गोल वाटोळा गोरागोरा चेहरा, पसरट धारदार नाक, खोल भावदर्शी डोळे, कपाळावरच्या आडव्या आठ्या, बारीक कापलेले पांढरे, भुरके केस, नाकाच्या थोड्या वरून दोन्ही बाजूंना खाली जाणाऱ्या वार्धक्यामुळे आलेल्या दोन वळ्या, हनुवटी खाली लोंबणारी दुसरी त्वचेची हनुवटी, वयाने सत्तरीच्या आसपास पोहोचलेले, पण सदैव उत्साहाने भरलेले दुडक्या चालीने वार्डच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत केव्हाच पोहोचत. त्यांच्याबरोबर चालणाऱ्या हाऊसमन रजिस्ट्रारची त्यांच्याबरोबर राहाताना तारांबळ उडायची, त्यातल्या त्यात ती मुलगी असेल तर विचारूच नका. राउंड झाली की शेजारच्या खोलीत कडेला स्टुलावर बसायचे. मुलांचे भोवताली अर्धवर्तुळ, शेजारी व्हीलचेअर मध्ये मांजरपाटाचे कपडे घातलेला रुग्ण, त्याच्या अंगावर विरलेली तांबडी लोकरी शाल. कधी ते खिडकीला टेकून उभे राहायचे. प्रकाशाकडे पाठ, आमच्याकडे चेहरा आणि भारलेल्या, अस्खलित संथ, आवाजात शिकवत राहायचे. पोटातील तिडीक आवाजात उमटायची, आयुष्यभराची अनुभवाची कमाई आमच्यासमोर ओतायचे. काय घ्यायचे आणि कसं घ्यायचे हेच कळायचे नाही. आम्ही भारावून ऐकत असू.

तसे सर मला फार आवडत होते, किंवा मी त्यांचा लाडका विद्यार्थी होतो असे अजिबात काही नाही. भोवताली काय चाललंय याचा पत्ताच तेव्हा मला नसायचा. गंभीर चेहरा करून मी सगळे काही समजून घ्यायचा प्रयत्न करीत असे. पण बऱ्याच गोष्टी डोक्यावरून जात.

वाकनीस डॉक्टरांकडे आम्ही शिकायला म्हणून आठ विद्यार्थी सप्टेंबरच्या पहिल्याच आठवड्यात आलो असू. आमची पहिलीच हॉस्पिटलच्या परिसरातली टर्म. वैद्यकीय शिक्षणाचा श्रीगणेशा तेव्हा झाला. त्यांच्या हाताखाली आम्ही जेमतेम आठदहा दिवस शिकत होतो.

पहिले दोन तीन दिवस ते घाईघाईतच आले आणि निघून गेले. आम्हा विद्यार्थ्यांची जेमतेम ओळख त्यांनी करून घेतली. चौथ्या दिवशी मात्र जवळजवळ दीडदोन तास शिकवत होते. शिकवायला माझ्या देखरेखीखाली असलेला रुग्णच त्यांनी निवडला होता. त्यांनी इशारा केला आणि मी रुग्णाची माहिती सांगू लागलो.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रुग्ण समोरच्या कॉटवर झोपलेला होता. आणि केविलवाण्या नजरेने किंचित औत्सुक्याने आळीपाळीने आमचे चेहरे पाहात होतो.

"गुलाबरावाचे वय ५५. महिन्यापूर्वी सुरवात डोकेदुखीने झाली. सकाळी त्यांचे डोके दुखत होते. चारच्या सुमारास एकाएकी बेशुद्ध झाले. दुसऱ्या दिवशी हॉस्पिटलमध्ये शुद्ध आली तेव्हा उजव्या शरीरात ताकद नव्हती. दोनतीन दिवस बोलता येत नव्हते. आता अडखळत अडखळत बोलतात. उजवा चेहरा, उजवा हात, उजवा पाय यात अजिबात ताकद नाही. हात आणि पाय जड ठोकल्यासारखे झालेत," मी थांबलो.

"तुमचे निदान नाही सांगितलंत" सरांनी विचारले.

"अर्धांग वायू, अर्थात उजव्या बाजूचा, कारण मेंदूतील रक्तवाहिनीत रक्ताची गाठ (Cerebral thrombosis) होणे."

"पुढे, थांबलात का ? गाठ व्हायचे कारण ?"

"सिफलीस, ॲथेरोसीस, रक्तदाब."

"परीक्षा काय काय कराल ?"

"Kahn; W. R.; C.S-F."

त्यांनी मला थांबवले.

"Skull X–Rays" दुसरा कुणीतरी म्हणाला.

"कशाकरिता ?" ते त्याच्याकडे वळले.

"कदाचित गाठ, ब्रेनट्यूमर असले तर त्याचा शोध घेण्यासाठी"

"मग एक्सरेत काय दिसणार आहे ?" ते पुन्हा माझ्याकडे वळले.

"यस्...डॉक्टर, ब्रेन ट्यूमरमध्ये तुम्हाला एक्सरे मध्ये काय आढळणार ? बोला. हा तुमचा पेशंट आहे ना ?"

"सर ..सर... माझे त त प प व्हायला लागले. ब्रेन ट्यूमर आणि कवटीचे क्ष किरण फोटो दोन्ही शब्द मी आयुष्यात पहिल्यांदाच ऐकत होतो. त्यांचा पुरता अर्थसुद्धा माहिती नव्हता. मी सरांची रोखलेली नजर चुकवायचा प्रयत्न करू लागलो. मी मान खाली घातली.

"येत नसेल तर नाही म्हणावे."

"मला माहीत नाही सर." मी हळू आवाजात पुटपुटलो.

"मग उद्या वाचून या. उद्या सगळयांना तुम्हीच याची माहिती सांगायची. X–Ray findings in Brain Tumor. आम्ही सगळे ऐकू."

"येस सर." मी म्हणालो. आणि सुटलो म्हणून घोळक्याच्या बाजूला सरकलो. हायसे वाटले.

डॉ. वाकनीस दुसऱ्याकडे वळले. ज्याने ब्रेन ट्यूमरचा विषय काढला होता.

"कुठले ट्यूमर तुला अपेक्षित आहे या रुग्णाला या वयात ?"

आता त्याची दातखीळ बसायची पाळी होती. तो सरांची नजर टाळून इकडे बघायला लागला.

"तुमचे नाव ?"

"देशमुख सर.

"कुठली टर्म ?"

"दुसरी टर्म.

"वेल, तुम्हीही उद्या उत्तर द्या."

"उद्या तुमचा ऑफ डे सर."

"मग परवा बरोबर अकरा वाजता.

डॉ. वाकनिसांनी पुन्हा मला हाक मारली.

"याला काय काय उपचार सुरू आहेत ?

"त्यांना शिरेतली इंजेक्शने देण्यात येत होती. Aminophyllin आणि Nicotinic Acid."

"कशाकरिता ?" "रक्तप्रवाह वाढण्याकरिता मेंदूतला, दिवसाआड किंवा आठवड्यातून दोनदा."

"आणखी तुम्ही काय कराल ?"

"पेनिसिलीन."

"का...का.. कशाकरिता. त्याला ताप नाहीय."

"जर त्याला सिफिलीस असला तर ....मी प्रथम ते निश्चित करीन."

"Good Answer, फार उत्तम. आणखीन काही ?"

ते मघाच्या देशमुखाकडे वळले. तो माझ्याबरोबर असलेला सिनिअर विद्यार्थी होता. त्याच रुग्णाची देखभाल करणारा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" Anti Coagulants. रक्त गोठण्याची क्रिया कमी करणारी औषधे. "

" आपण याला दिली का ? "

" नाही. "

" का नाही ?"

" रक्तस्राव व्हायची भीति असते. सुरवातीला त्याचा अर्धांगवात रक्तस्रावामुळे आहे की रक्त गोठण्यामुळे आहे हेच निश्चित नव्हते. नंतर त्यांची जरुरीच नव्हती."

" वा, उत्तम. आणखी काही ?"

कुणीच उत्तर दिले नाही.

सरांनी आपली बॅग उघडली आणि बॅगेतून काही कागद बाहेर काढले, पत्रकासारखे दिसणारे. त्यांनी आमच्या प्रत्येकासाठी एकेक कागद जवळच्या मुलाजवळ दिला. प्रत्येकाच्या हातातून फिरत फिरत एक प्रत माझ्या हाती आली. सरांनी लिहिलेल्या वैद्यकीय लेखांचे ते रिप्रिंट होते. कुठल्याशा जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेले. " Management of cerebral thrombosis with stellate Block. –Dr. C. S. Waknis."

सरांची अस्खलित वाणी इंग्रजीतून कानावर पडायला लागली.

" मेंदूच्या रक्तवाहिन्यांच्या आसांचे नियंत्रण करणारे मज्जातंतू Sympathetic–Parasympathetic संस्थेतून येतात. ते मानेत असलेल्या स्टॅलेट (Stelate) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मज्जापेशी समूहापासून निघतात. हा पेशीसमूह मानेत वरच्या बाजूला असतो. हा जर अकार्यक्षम केला, तिथे काही औषधे टोचून – तर मेंदूला कमी झालेला रक्तपुरवठा वाढू शकेल. रक्तवाहिन्या प्रसरण पावतील. रक्तपुरवठा वाढेल व काही प्रमाणात बंद झालेले कार्य पुन्हा सुरू होईल. Neupercaine, Novocaine या सारख्या स्थानिक भूल देण्याकरिता वापरण्यात येणारी औषधे या पेशीसमूहात टोचायची. त्याने रुग्ण पुष्कळ सुधारतो. त्याची हातापायातली ताकद पूर्ववत व्हायचे प्रमाण वाढते. मी दोनशे रुग्णात या उपचारांचा प्रयोग केला. त्याचे परिणाम या लेखात दिलेले आहेत. ८० रुग्णांत भरपूर सुधारणा झाली. १०% टक्के रुग्णांत ५०% टक्के सुधारणा झाली. १०% टक्केना उपचारांचा काहीच उपयोग झाला नाही."

आमचे सगळे संभाषण अर्थातच इंग्रजीतून चालले होते. गुलाबरावांना इंग्रजीचा अजिबात गंध नव्हता. पडल्या पडल्या तो आपला अधू उजवा हात धड असलेल्या डाव्या हाताने कुरवाळत होता आणि आमच्या सर्वांकडे आळीपाळीने बघत होता. सर उघड्या खिडकीत आमच्याकडे तोंड करून उभे होते. पार्श्वभूमीवर उघडे आकाश, निळेशार दिसत होते. बाहेरच्या भक्क उजेडामुळे आम्हांला सरांचा चेहरा आता नीट दिसत नव्हता. त्यांची फक्त आकृती दिसत होती आणि शब्द कानावर पडत होते. आम्ही आदराने भारावून ऐकत होतो.

गुलाबरावाने सरांना थांबवले.

" साहेब, पहिल्या पहिल्याने चांगली सुधारणा होती. अजिबात वाचा गेली होती ते आता थोडं का होईना बोलाया येतय," तो अडखळत बोलत होता. " पण हा हात लाकडाच्या ओंडक्यासारखाच आहे." बोलता बोलता त्याने डाव्या हाताने उजवा हात वर हवेत उचलला आणि सोडून दिला. तो धप्प आवाज करीत त्याच्या पोटावर आदळला. त्याने पायाकडे बोट दाखविले.

" पाय तर हालतबी नाही. घरी बायका पोरं आहेत. कर्तं सवरतं कोणी नाही. मीच एकटा. कारभारीण काय काय करणार ? पेरण्या करायची वेळ झालीय्. कमीत कमी मला चालत करा. हात नसला तरी चालेल मी उभा असलो म्हणजे एका हातावर भागेल. "

त्याच्या डोळ्यात अश्रू उभे होते. सर पुढे झाले. त्यांनी वाकून त्याच्या खांद्यावर थोपटले.

" उद्या आपण आणखी वेगळे इंजेक्शन देऊ. त्याने अजून सुधारणा होईल. कितपत ते आधी सांगता यायचं नाही. पण काहीतरी सुधारणा होईल उद्या. "

गुलाबरावांच्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यात आनंद तरारला. चेहरा हास्याने फुलून आला.

" हा Stellate block आपण गुलाबला उद्या देऊ. मी तुम्हाला दाखवितो. ही क्वचित केली जाणारी गोष्ट आहे. कदाचित पुन्हा तुम्हांला बघायलाही मिळणार नाही. "

" उद्या तुमचा ऑफ डे सर."

" मग परवा. प्रथम आपण हे दोन डॉक्टर काय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिकवतात ते ऐकायचे. नंतर मी तुम्हाला हे दाखवीन." त्यांनी घड्याळाकडे पाहिले. आणि ते बाहेर निघाले. दुपारचा एक वाजला होता. माझ्या संपूर्ण वैद्यकीय विद्यार्थी दशेतली जवळजवळ २॥–३ तास शिकवणे चाललेली ही एकच एक वेळ होती.

गुलाबराव दुसऱ्या दिवसापासूनच माझ्या मागे होता. "साहेब येतील तेव्हा सगळे तयार ठेवा. माझे इंजेक्शन आधी द्यायची आठवण करा. मग तुमचे सावकाश चालू द्या. भले चार तास का तुम्हांला शिकवत बसेनात ते. पण मला एवढे पायावर उभं राहू द्या."

त्यानंतरच्या तिसऱ्या दिवशी मी वार्डात जरा उशीराच गेलो. अकरा वाजले होते. सगळीकडे भयाण शांतता होती. माझी त्या वार्डामध्ये पाऊलही टाकायची इच्छा नव्हती. आणि पायात ताकदही नव्हती. पाय गळून गेले होते. कसाबसा मी वार्डमध्ये गेलो. काही काम होते. जायलाच हवे होते म्हणून. आमच्या बॅच-मधला एकही विद्यार्थी आलेला नव्हता. माझ्या हाता-तल्या वहीत गेले दोन दिवस अहोरात्र खपून मी तयार केलेल्या नोटस् होत्या. "ब्रेन टयूमरची एक्सरे लक्षणे" सरांना वाचून दाखवायच्या होत्या. त्यांची शाबासकी मिळवायची होती. त्यांच्या नजरेतून येणारे पाठ थोपटणे बघायचे होते.

गुलाबराव माझ्या येण्याची बराच वेळ वाट पाहात होता. सकाळपासून वार्डमध्ये डॉक्टर, विद्यार्थी कुणाचीच येजा नसावी. मला पाहताच त्याने हाक मारली. मला त्याच्याकडे वळावेच लागले. माझीही त्याच्याकडे जायची अजिबात इच्छा नव्हती.

"साहेब केव्हा येणार आहेत ? तुम्ही सांगितल्या-प्रमाणे मी सकाळपासून काही खाल्लं नाही. उपाशी आहे. डोक्याची मागची बाजू शेव्ह केलेली आहे. सगळं तयार आहे. साहेब आले की लवकर इंजेक्शन द्यायला सांगा." त्याच्या मानेच्या मागच्या बाजूला सगळी तयारी करून एखाद्या ऑपरेशनच्या पूर्वतयारीप्रमाणे सिद्धता करण्यात आलेली मला दिसत होती. त्याच्या स्वरात विलक्षण अधीरता होती.

"सर येणार नाहीत." मी थांबलो. मान खाली घातली. आणि झटकन म्हणून टाकले, "सर वारले काल रात्री एकाएकी !

गुलाबरावाचा पडलेला चेहरा पाहण्याचे धैर्य माझ्यात नव्हते. त्याच्या नजरेला नजर मला निदान त्या क्षणी देववणार नव्हती. त्याला बसलेला धक्का मला पाहवणार नव्हता.

माझ्या हातातल्या वहीतले 'X–Ray findings in Brain Tumour' चे कागद चाळवीत मी माघारी वळलो. ते कागद पाहायला, ते वाचलेले ऐकायला डॉ. वाकनीस आता या जगातच नव्हते.

रात्री केव्हातरी देशमुख माझ्या घरी आला होता. ही कटु बातमी घेऊन "सरांचे डोकं काल दुपारपासून दुखत होते. रात्री बेशुद्ध झाले. अर्ध्या शरीराची ताकद गेली होती. Cerebral hemorrhage, रात्री दीडला वारले."

देशमुख आणि मी त्या अपरात्री, भयाण काळो-खात, थंडगार झोंबणाऱ्या थंडीत ही दुःखाची वार्ता दोघाचौघांच्या घरी सांगत हिंडलो. कुणी ऐकली, कुणाची अवस्था आमच्या सारखीच झाली. बधीर. सारी गात्रं बधीर झालेली ! एक सद्गृहस्थ भल्या पहाटे साखर झोपेत व्यत्यय का आणला म्हणून गॅलरीतूनच आमच्यावर कावले. त्यांनी दार उघडायची-ही तसदी घेतली नाही. "What a nonsense to wake somebody at this hour." ते बडबडत राहिले.

अर्थातच कोण कावले, कोण दुःखाने आर्त झाले हेही कळायच्या मी मनःस्थितीत नव्हतो.

उच्च अभिरुचीचे संस्कारी साहित्य वाचण्यासाठी

विदर्भ साहित्य संघाचे सभासद व्हा

आणि 'युगवाणी' घरपोच मिळवा !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. स. शं. देसाई यांच्या 'विविध लेखां'तील साहित्य–विचार

श्रीनिवास रामचंद्र सिरास

दहा निरनिराळ्या विषयांशी संबंधित अशा 'विविध लेख' या संग्रहात एक महत्त्वाची जर कोणती गोष्ट आढळून येत असेल तर त्या लेखांचे एकाच समान पायावरती असलेले अधिष्ठान. या दहा लेखांना लेखकाने 'विविध' अशी उपाधी दिली खरी; पण त्या साऱ्या लेखांचे 'ललित कृती' हे एकमेव अधिष्ठान स्पष्ट आहे. प्रत्येक लेखकाला ज्याच्या त्याच्या विशिष्ट शैली-मुळे साहित्याच्या प्रांतात मोल असते. पण हा लेखक म्हणजे नुसताच बडेजाव, किंवा नुसतेच एकांगी जीवन नसते. लेखक मग तो पृथ्वीतलावर कोठेही वावरणारा असो; तो प्राचीन ऐतिहासिक काळातला असो अथवा मधल्या रोमँटिक काळातला असो किंवा आजच्या विज्ञान युगातला असो; भाषा, भूगोल, शरीरभाव किंवा मनोविकार या कुठल्याही मर्यादांनी वाङमयाला मर्यादा पडत नाहीत हे सांगण्याचा 'विविध लेखां'चा उद्देश असून तो बऱ्याच अंशी पूर्ण करून घेण्यात प्रा. स. शं. देसाई हे यशस्वी झालेले आहेत.

या दहा लेखांमधून साहित्यसृष्टीत वावरणाऱ्या विविध ग्रंथकारांचा प्रा. स. शं. देशाई आपल्याला परिचय करून देतात. कधी ह्या ग्रंथकाराबद्दल ते सांगतात, कधी त्याच्या निर्मितीबद्दल तर कधी सबंध कलावंतांच्या एकत्र संघटनेच्याबद्दलही ते परिशीलन करताना आढळतात. कलावंत आणि त्या कलावंताची निर्मिती ही दोन भिन्न रूपे आहेत काय, असा प्रश्न हे 'विविध लेख' वाचून झाल्यावर उत्पन्न होतो. कारण कधी एखाद्या कवीचे उदाहरण घेऊन ते त्या कवीनेच स्वतः होऊन आपले काव्य समाजापासून कसे दडवून ठेवले तेही सांगतात. साहित्य म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे, तर तो लेखकाने आपल्या मेंदूचे सहकार्य घेऊन केलेला शरीरव्यापार आहे हे त्यांनी या लेखांतून स्पष्टपणे मांडलेले आहे. कलावंत हा आपले जीवन एक प्रकारच्या धुंदीतच जगतो पण ती धुंदीच नेमकी त्याला जीवन जगण्यात अडथळा उत्पन्न करीत असते, असे सांगण्याचा तर श्री. स. शं. देसाई यांचा इरादा नाही ना, अशी शंका येते.

फ्रांझ काफ्का, मार्सेल प्रुस्त, आर्थर रँम्बो व टी. एस्. इलियट या जगभर गाजलेल्या कलावंतांवर जसे स्वतंत्र लेख समाविष्ट केले गेले आहेत तसेच मराठी साहित्य व साहित्यकार यांचाही योग्य तिथे समावेश झालेला इथे आढळेल. शिवाय एका कादंबरी-तल्या पात्रांनाच लेखकाने पुनरुज्जीवित करून आपल्या ग्रंथाचा उद्देशही मोठ्या कौशल्याने साधलेला आहे.

'आर्थर रँम्बो' हा लेख सगळ्यात उत्कृष्ट ठरणारा आहे. या सुटसुटीत लेखात व्हिक्तर ह्यूगोने ज्याला 'छोटा शेक्सपिअर' अशी पदवी दिली त्या रँम्बोचे कलाजीवन अत्यंत नेमकेपणाने समोर आणले आहे. रँम्बो स्वतःच्याच कवितेला ओळखू शकला नाही असाही सूर श्री. देसाई हे ध्वनित करतात. कारण तो जन्मभर असंतुष्ट राहिला व शिवाय त्याला त्याच्या समोर कधीही आपली स्तुती ऐकावीशी वाटली नाही. पण पुढे जाऊन जेव्हा ते लिहितात की रँम्बो हा बंडखोर होता व म्हणूनच तो युरोपला आकुंचित डवके मानणारा स्वैर कवी बनला, त्याने नियमांचे बंधन झुगारले व नवीन प्रकारची नवीन कविता लिहिली; तेव्हा प्रश्न उद्भवतो तो असा की खरोखर रँम्बो आपल्या कवितेबद्दल उदास होता की ती कविताच त्याला आवडेनाशी झाली होती? कारण जगाने त्याला असामान्य प्रतिभेचा कवी ही संज्ञा दिली, मानसन्मान दिला पण त्यातून मोठेपणा मिळा-ल्याचा आनंद त्याला कधीही लाभल्याचे दिसत नाही. दिसते ती त्याची स्वतःच्या कवितेबद्दलची हेतुगर्भ चिंता. तो शीघ्रकवी होता हे इथे विसरणे योग्य नाही. भराभरा तो काव्य निर्माण करताना त्याला कदाचित स्वतःच्याच कवितेच्या रसिकांबद्दलची वाटणारी तीव्र अनुकंपा तर प्रगट होत नसेल? दुसरे म्हणजे रँम्बोची वृत्ती. कलंदर वृत्तीचा रँम्बो शीघ्रकोपिष्ट होता. त्याने रागाच्या भरात आपल्या व्हेर्लेन या सहप्रवासी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मित्राच्या डोक्यावर काठीचा प्रहार केल्यामुळे व्हेर्लेन मूर्च्छित झाला. शेवटी रॅम्बोला व त्याच्या कवितेला 'आडदांड नवरा व सेवेस तत्पर असलेली स्त्री' अशी उपमा देऊन लेखकाने रॅम्बोचा कवितेबद्दलचा जो दंडक होता तो सांगितला आहे. जसे बायकोला हाक मारल्यावर तिने हातचे काम बाजूस ठेवून नवऱ्याच्या सेवेला यायलाच पाहिजे, तसे आपण लिहायला बसलो की कविता आपणास स्फुरलीच पाहिजे असा रॅम्बोचा दंडक होता. पण कलावंताची प्रतिभा व त्याचे मन यातला सूक्ष्म फरक जर पाहिला तर यातून रॅम्बोची शीघ्रकवित्वशक्तीच जास्त प्रगट होते, काव्यनिर्मिती-बद्दलचा त्याचा आत्मविश्वास नव्हे !

'इंग्रजी कविता कालची व आजची' या लेखात श्री. देसाई यांनी काव्य-प्रतिभा-कलावंत या संबंधातून उत्पन्न होणाऱ्या निर्मितिप्रक्रियेचा शोध घेतलेला आहे. जो इंग्लंड देश एकेकाळी श्रेष्ठ कवींसाठी प्रसिद्ध होता त्याच इंग्लंडमधील कवितेत तोचतोचपणाचा दोष उद्‌भवला, त्यामुळे कवी अप्रिय झाले व शेवटी कवितेलाही वाईट दिवस आल्यासारखे दिसले. या एकंदर परिस्थितीची लेखकाने उत्तम रीतीने कारण-मीमांसा शोधलेली आहे. कविता लिहिणाऱ्याला फक्त त्या लिहिणे एवढेच अभिप्रेत नसते; त्याला त्या वाचल्या जाव्या अशीही इच्छा असते. इंग्लंडमध्ये सुधारलेल्या वर्गातल्या कवींनी डाव्या विचारसरणीचा स्वीकार केल्यानंतर त्यांना इंग्लंडमधला व युरोपातला मजूर वर्ग आणि शहरी बकालपणा हाच एक नेहमीचा खाद्य पुरविणारा विषय मिळाला. त्यातूनच तोचतोच-पणाचा दोष इंग्लिश काव्यात शिरला. पण इकडे युरोपियन मजुरांना मात्र स्वतःच्या जीवनाची ती अतिरंजित चित्रेही नकोशी झाल्याने या कवितेकडे कुणाही सहृदय रसिकाची सहानुभूती वळू शकली नाही !

दुसरे महायुद्ध साऱ्या जगाला धक्का देणारे ठरले तसेच ते इंग्लंडलाही पराजयाचा धक्का देऊन गेले. पण या काळात असंख्य कवी निर्माण होत असतानाही इंग्लंडला महान प्रतिभेचा कवी मात्र लाभूच शकला नाही. एक हजार कवींच्या यादीतील फक्त शंभर दीडशे कवींचीच दखल काय ती टीका-कारांनी घेतली आणि त्यातले अर्धे विस्मरणाच्या पडद्यात केव्हाच नाहीसे झाले. उलट समाजवादाच्या प्रचारासाठी म्हणून लिहिणाऱ्यांचा नवा वर्ग आधीच्या 'इमेजिस्ट' व 'जॉर्जियन' कवितेशी स्पर्धा करू लागला. नवकवितेचा 'सिंबॉलिस्ट' असा गट दृढ झाला. Vers libers म्हणजे मुक्तरचना अथवा मुक्तछंद यांचाही वापर झाला; पण त्या कशाचाही उपयोगच झाला नाही. १९१६ ते १९२१ या काळात प्रतिभावादी कवींनी जॉर्जियन कवितेच्या विरुद्ध मोहीम उभारली.

१९२२ पासून टी. एस. इलियटचा उदय झाल्यावर काही काळ त्याच्या हंगामी काव्याने साऱ्यांनाच दिपवून टाकले. कारण परिपक्वता आलेल्या १९३० नंतरच्या कवींनी असहायपणाची कबुली दिली होती व आधुनिक कवींच्या कम्युनिस्ट मतप्रणालीचे कारण टी. एस. इलियटचे पुढारीपण हे होते.

दुर्बोध कवितेची निर्मिती झाली तरीही शेवटी टी. एस. इलियटने आपले वैचारिक स्थित्यंतर नाकारले नाही. कारण कम्युनिझमबद्दलचे त्याचे आकर्षण हे स्वाभाविक नव्हते तर ते तात्कालिक होते. लवकरच त्याची कम्युनिझमवरली श्रद्धा उडाली व तो कम्यु-निस्टांच्या विरुद्ध बनला. या अवस्थेला लेखकाने 'हंगामी' हा शब्द योजलेला आहे. पण 'हंगामी' म्हणण्यापेक्षा याला 'कवीची धुंदी' म्हणणे समर्पक ठरणारे आहे.

'वेस्ट लॅण्ड' या अत्यंत सुंदर आणि स्तिमित करणाऱ्या काव्याची निर्मिती टी. एस. इलियटने केली; तरीही ही निर्मिती ज्या अवस्थेत त्याने केली ती अवस्थाच 'हंगामी' होती असे म्हटल्याने टी. एस. इलियटच्या पुढल्या लिखाणातल्या बदललेल्या विचार-धारांचे समर्पकपणाने प्रतिपादन होत नाही. ती 'कवीची धुंदी'च आहे असे मानावे लागते. जितका कवी मोठा असेल तेवढे त्याचे मनही धुंदीसाठी जास्त आसुसलेले राहील. आणि या धुंदीनेच कवीला त्याचे सामाजिक जीवन जगण्यास अडथळे निर्माण केलेले आढळून येतील.

प्रत्यक्षात १९२९ साली इलियटने आंग्लिकन चर्चची दीक्षा घेतल्यावर जाहीर केले की माझा धर्म आंग्लो-कॅथलिक आहे पण साहित्यात मात्र मी अभि-जातवादी – Classicist आहे. आज ज्या टी. एस. इलियटला इंग्रजी काव्यातील 'पोप' अथवा 'प्रेषित'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हटले जाते व ज्याला नोबेल प्राइझ व ऑर्डर ऑफ मेरीट, यांसारखे बहुमान लाभले त्या कवीने काव्य, प्रतिभा व कलावंत यांच्या संबंधाबद्दल कितीही लिहिले असले तरीही स्वतः कवीची त्याच्या धुंदीतून सुटका नसते हे नाकारता येत नाही, हेच या लेखातून प्रा. स. शं. देसाई हे पटवून देतात.

टी. एस. इलियट हा पुढल्या काळातील राजकीय दृष्टचा डाव्या गटातल्या कवींचा आवडता कवी तर बनलाच पण त्यानंतरचा नवा संप्रदाय बनविणाऱ्या डब्ल्यु. एच. ऑडेनचा तो गुरू बनला. ऑडेन व स्टीफन स्पेंडर हे दोघे मित्र होते खरे, पण त्यांनी एक गट प्रस्थापित केला. त्यांनी मुक्त छंदवाद्यांचे रचनास्वातंत्र्य नाकारले पण मन अस्वस्थ न करू शकणाऱ्या अशा खिन्नतेचा मात्र आग्रह धरला. आजच्या मराठी कवितेकडे पाहिले तर याच प्रकारची बळजोरी मराठीतल्या कवींनीं कधी स्वतःहून तर कधी जाणून बुजून केलेली दिसते. इंग्रजी कवितेचे मराठी कवितेशी असलेले संबंध हे केशवसुतांपासूनचे जुने आहेत. त्याचमुळे इंग्रजी कवितेला भोगावी लागलेली ओहोटी मराठीतल्या कवितेच्याही नशिबी येणे अनिवार्यच होते.

या सांप्रदायिक कवींना भावनांवरचा विश्वासच अमान्य होता. त्याचा परिणाम असा झाला की, काव्यावर बुद्धीचा जास्तीत जास्त पगडा बसू लागला. इंग्रजी कवितेतली जी रुक्षता तेव्हा उत्पन्न झाली तिचे कारण हे भावनेच्या अस्तित्वाला नाकारणे हेच होते. त्या सांप्रदायिक इंग्रजी कवींच्याप्रमाणे आजही मराठीत अनेक कवी इंग्रजी कवींच्याच वळणावर जाऊन कविता रचण्यामागले खरे कारण हे आहे. उदाहरणादाखल मराठीतले विलास सारंग, सुरेश मथुरे, डाहाके इ. सारखे कवी. वर सांगितलेल्या कारणामुळेच तत्कालीन इंग्रजी कवींमध्ये मर्यादित अनुभवाचा दोष उत्पन्न झाला. हा संप्रदाय जुनाट झाल्यावरसुद्धा नव्या कवींना मार्गदर्शक असा गुरू भेटू शकला नाही, असे श्री. देसाई यांचे मत आहे.

कवितेनंतर कादंबरी या प्रकारच्या परामर्षाकडे श्री. देसाई वळतात व त्या अनुषंगाने मार्सेल प्रुस्त व काफ्का या लेखकांचा व त्यांच्या रचनांचाही थोडक्यात परिचय घडवतात. त्याचबरोबर आर्थर कोस्लर यांच्या 'द एज ऑफ लाँगिंग' या कादंबरीचाही परिचय घडवून देतात. काफ्का व प्रुस्त यांचे जीवनचरित्रच त्याच्या लिखाणातून उभे झाले; पण त्याला नाविन्याची विलक्षण वेधक अशी पार्श्वभूमी असल्याने ते दोघेही लेखक जागतिक वाङ्मयात नवी पातळी निर्माण करू शकले. पण कोस्लर यांची ही कादंबरी कसलीही खळबळ निर्माण न करणारी पण विनोदी आवरणातून आजच्या सत्य राजकीय वातावरणाची जाणीव करून देणारी आहे. या कादंबरीत फ्रेंच हेर, रशियन लेखक, फ्रेंच लेखक या पात्रांसोबतच गायकाचे काम करणारा रशिया सोडून पळालेला रशियन लेखक व निर्वासित क्रांतिकारक अशा प्रकारची पात्रे सापडतात. यातूनच भूतकाळातले राजकारणी वर्तमानात सामान्य जीवन जगू पाहात असतानासुद्धा वर्तमानातल्या राजकीय संबंधांच्यामुळे कशा प्रसंगात सापडतात ते कोस्लरने विनोदी ढंगाने वर्णन केलेले आहे. हे मुळातूनच वाचण्यासारखे आहे

कादंबरीच्याच बाबत 'एक विलक्षण साहित्य शार्विलकी' या लेखात श्री. ना. सी. फडके यांनी केलेल्या आल्फाँस दोंदे या फ्रेंच लेखकाच्या 'तर्तारां द तारास्काँ' या कादंबरीच्या सहीसही उचलेगिरीचे बिंग लेखकाने फोडले आहे. या कादंबरीतल्या प्रत्येक भागाची उचल करून श्री. ना. सी. फडके 'सरिता-सागर' ही कादंबरी लिहितात. पण कादंबरीसाठी पार्श्वभूमी मात्र ते गोव्याची घेतात. यातच या लेखाचे कारण सामावलेले आहे. 'युलिसिस' या कादंबरीचा लेखक जेम्स जॉईस आपल्या कादंबरीत जी डब्लिन शहराची बदनामी करतो त्याचे कारण एका पाश्चिमात्य समीक्षकाने म्हटल्याप्रमाणे जेम्स जॉईसचा डब्लिन शहरात कधीतरी झालेला अपमान हे असावे, व त्या अपमानाचा सूड म्हणून त्याने 'युलिसिस' लिहिली असावी. हे उदाहरण देऊन पुढे लेखक म्हणतात की, श्री. ना. सी. फडके यांचाही गोव्यात अपमान झालेला असावा व म्हणून ते गोव्याची वारंवार बदनामी करतात. जेम्स जॉईसविषयी पक्के सांगता येत नसले तरी ही श्री. ना. सी. फडक्यांच्या गोव्याबद्दल असणाऱ्या कटुतेचे कारण काही फारसे गुपित नाही.

खरे श्रेष्ठ साहित्य म्हणजे ज्यातून लेखक स्वतःचे प्रतिनिधित्व करतो ते, असे लेखकाचे मत आहे. 'फ्रांझ काफ्का' या लेखात पृ. १०० वर ते म्हणतात :-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" काफ्का, चाप्लिन किंवा कोस्लर हे भटाक्या ज्यूंचे, प्रतिनिधी आहेत. काफ्काचा जन्म प्राग शहरी झाला तेव्हा झेकोस्लोव्हाकिया हा आस्ट्रो–हंगेरियन साम्राज्यात मोडत होता. कैक शतकेपर्यंत सातत्याने प्राग शहरातील ज्यूंना घेटो (Ghetto) मध्ये राहावे लागले होते. अठराव्या शतकात 'घेटो' काढून टाकण्यात आल्यावर त्यांना इतर लोकांमध्ये मिसळण्याची परवानगी देण्यात आली. त्याकाळी जर्मन भाषिक लोक सत्ताधारी असल्याने जित ज्यू व झेक लोकांना ते कमी मानीत. ज्यू कलावंतांना आणि बुद्धिवंतांना त्याची तीव्रतेने जाणीव व्हायची. त्यामुळे ज्यूंना साहजिकच जर्मन लोकांमध्ये मिसळणे भाग पडले. कारण ते सुसंस्कृत आणि मध्यमवर्गीय होते. त्याचा परिणाम असा झाला की, ते झेक लोकांच्या तिरस्कारास पात्र होऊन त्यांच्यापासून दुरावले गेले." थोडक्यात काफ्का हा जन्मापासून श्रीमंत नसल्याने व पुढे त्याचे वडील सधन झाले तरीही व त्यांना ते कारखानदार असले तरीपण त्यांच्या कारखान्यातले झेक मजूर मान देत नसल्यानेच तो निराशावादी बनला. त्याच्या कादंबरीतले 'के' या एकाक्षरी नावाने ओळखले जाणारे नायक हे नुसतेच नायक नसून ते जगातल्या असहाय्य आणि पीडित ज्यूंचे प्रतीक आहेत असे मत लेखकाने मांडले आहे. पण येथे लेखकाच्या निर्मितीचा विचार फक्त भौतिक दृष्टीतूनच मांडला जातो. काफ्काच्या कादंबऱ्यातले विचार हे लौकिक पातळी गाठणारे आहेत, म्हणूनच त्या लेखनाच्या संदर्भात मनोविश्लेषणपद्धतीचाच वापर योग्य ठरतो व काफ्काला निखळ कलावादी लेखकच म्हणावे लागते; हे मत जास्ती योग्य ठरले असते असे वाटते.

'ग्रीक संस्कृतीचे क्रांतिकार्य' व 'टीका–विवेकच्या निमित्ताने' या दोन्ही लेखांतून लेखकाने टीकेच्या विविध पद्धतींचा ऐतिहासिक संदर्भातून मागोवा घेतलेला आढळतो. दुसऱ्या लेखात प्रा. क्षीरसागर यांच्या ग्रंथातील काही उणीवा दाखवून 'टीका-विवेक' सारख्या ग्रंथाने मराठीत टाकलेली भर किती मोल्यवान आहे हे सांगितले आहे. 'ग्रीक संस्कृतीचे क्रांतिकार्य' हा लेख बराचसा इतिहासवजा असून ग्रीकांना कशा तऱ्हेने बुद्धिवाद व कलावाद मांडण्याकरता चळवळ उभारावी लागली त्याचे सविस्तर चित्रण श्री. देसाई करतात. अद्‌भुतरम्यवादाचा निर्माता मरण पावल्यानंतर त्याच अद्‌भुतरम्य वादातून नव्या निर्मात्याला वास्तववाद उत्पन्न करण्याची प्रेरणा होते. हे उदाहरण देऊन त्याद्वारे लेखकाने प्रत्येक 'इझम' चा प्रखरपणा त्याच्या प्रवर्तकांचे अस्तित्व नष्ट होताच कसा लोप पावतो हे सिद्ध करून दाखविले आहे. अत्यंत सरळ, सुटसुटीत भाषा आणि अभ्यासाचे सामर्थ्य या दोन्हींचा सुरेख समन्वय या लेखांत झालेला दिसतो. विशेषत: कवी आणि लेखक यांना हे पुस्तक जास्ती मौलिक खाद्य पुरविणारे ठरते. कारण त्यात असणाऱ्या विविधतेचा संबंध हाच मुळी सर्जनशील मनोवृत्तीशी आहे. मनुष्याच्या कलाप्रेमामुळेच कलानिर्मिती झाली. कलेची निर्मिती हीदेखील मनुष्याच्या अंगी असणाऱ्या कौशल्याचाच आविष्कार असते. अर्थातच या सर्जनापाठीमागील मानसशास्त्रीय भूमिका सशक्तपणे डोळ्यांसमोर उभी करण्यासाठी श्री. देसाई यांनी जगभरच्या विविध लेखकांच्या उदाहरणांचे सहाय्य घेऊन हे 'विविध लेख' लिहिले आहेत. ते लेख एकत्रितपणे वाचण्याची सोय केल्याबद्दल 'प्रहार प्रकाशन' चे मन:पूर्वक अभिनंदन.

[स. शं. देसाई, **विविध लेख**, प्रहार प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठे दहा + १२६, किं. रु. ८]

युगवाणीच्या कोणत्याही अंकात व्यक्त झालेल्या कोणत्याही मताशी विदर्भ साहित्य संघ वा संपादक सहमत असतीलच असे नाही.

विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना युगवाणीचा अंक पाठविला जातो. ज्या महिन्यापासून सभासदत्व स्वीकारले जाईल त्या महिन्यापासून पुढील उरलेल्या आर्थिक वर्षाच्या काळात निघणारे अंक पाठविले जातील.

वर्गणीदारांना ते वर्गणीदार होतील तेव्हापासून, संपूर्ण वर्षभर अंक पाठविले जातील.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वॉर्ड नं. अकरा

अनुराधा केने

रस्त्याने चालले की रस्त्याच्या दोन्ही कडेला निरनिराळ्या तऱ्हेची घरे दिसतात. त्या घरांच्या बंगल्यांच्या समोर अंगण असते. कधी छोटे, कधी मोठे कुठे हळवा प्राजक्त भरभरून फुललेला — टपटपत रहाणारा. कुठे हिरवागार उंच डौलदार अशोक आपल्या रेशमी वस्त्राची एकही घडी विस्कटू न देता आपल्याच तोऱ्यात उभा असलेला. कुठे गुलाब तर कुठे जाई, कुठे कृष्णकमळ तर कुठे बोगनवेल, कुठे मनिप्लँट, कुठे केक्टस. पण सारे काही पाहूनही नजर उदासच असते. तिचे स्वप्न काही वेगळेच असावे. आजही मी अशीच निघाले होते. प्रकृती ठीक नसल्याची भुणभुण बरेच दिवस होती. तेव्हा एकदा तपासून घ्यावे आणि शक्य तोवर बरेही होवून जावे अशा विचाराने अस्मादिकांचा मोर्चा मेडिकल कॉलेजकडे वळला होता. मनांत मात्र पुन्हा पुन्हा तो प्रश्न निर्माण होत होता, 'असेल कां कुठे एक तरी घर; एक तरी आवार, ज्यामधील झाडे पाहून मनाचे पूर्ण समाधान होईल ?'

विचारात असल्यामुळे मी हॉस्पिटलमध्ये कधी पोहोचले तेही मला कळले नाही.

मेडिकल कॉलेज हे नागपूरकरांचे अभिमानाचे आणि आदराचे स्थान.

अतिभव्य वास्तु.

आणि या अतिभव्य वास्तूलाही क:पदार्थ करून टाकणारी क्षुद्र ठरविणारी ओ. पि. डी. आणि वॉर्डमधील प्रचंड गर्दी. तशी सगळीच प्रचंड हॉस्पिटल्स ही मुंग्यांची मोठाली वारुळंच. पण असे तरी कसे म्हणावे. मुंग्यांमध्ये शिस्त असते अभिजात आणि अंगभूत. या गर्दीचा आणि शिस्तीचा संबंध लावणे जरा कठीणच जात होते.

अशा या प्रचंड कॉम्प्युटरमध्ये मी दाखल झाले. अगदी कोणाचीही मदत न घेता फक्त सेल्फहेल्पवर.

आणि सार्वजनिक हॉस्पिटलमधील आजपर्यंतच्या अनुभवांना धडाधड धक्के बसायला लागले.

'क्यू' मध्ये यथावकाश नंबर लागला आणि 'तिकिट' घेवून सांगितलेल्या कक्षांत आमची स्वारी दाखल झाली. समोरच बसलेल्या डॉक्टरांनी बसायला सांगितले. हे दोन पेशंट तपासतो आणि मग पहातो हं. मी त्या पेशंटसकडे पाहिले. एक असहाय दीन वृद्धा व एक घरधनीण नऊवारी साडीचा घोळ आवरीत आपल्या नंबरची प्रतीक्षा करीत होत्या.

मी क्षणभर सभ्रमात पडले. इथे कोणताही सौजन्य सप्ताह चालू असल्याचे ऐकण्यात नव्हते, किंवा वाचण्यात आले नव्हते.

तो शुभ्रवेशधारी डॉक्टर शांतपणे त्यांच्याकडून माहिती घेत होता, तपासत होता आणि भराभर उपाय योजना सांगत होता. त्या अशिक्षित खेडवळ स्त्रिया आणि तो समोरच्या खुर्चीवरील उच्च विद्याविभूषित डॉक्टर यांच्यात काहीच फरक नव्हता. त्याचे सारे व्यवहार मनापासून आणि सौजन्याने चालले होते.

खरे म्हणजे छातीतल्या आणि पाठीतल्या दुखण्याने मी अगदी त्रस्त झाले होते आणि तरीही सभोवार झालेला बदल मला स्पष्टपणे जाणवत होता. त्याने मी आश्चर्यचकित झाले होते.

मला तपासल्याबरोबर त्याने कार्डिओग्राम, ब्लड, युरिन टेस्टसाठी पाठविले.

मी जेव्हा तपासण्या करून घेण्यासाठी गेले तेव्हा मला सांगण्यात आले की 'थोडयाच वेळात हे रिपोर्ट घेऊन जा.

मी मनातच म्हटले, सौजन्य सप्ताह पाळण्याची गरज इथल्या कर्मचाऱ्यांना मुळीच नाही. ही गरज आहे ती इथे येणाऱ्या सामान्य माणसाला.

रिपोर्ट माझ्या हातात पडले आणि मला चक्रावल्यासारखे झाले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मी स्वत:लाच चिमटा काढला आणि विचारले, " आपण हिंदुस्थानातच आहोत ना ?"

" अगदी नक्की. " मन उत्तरले.

" मग, असे परदेशात असल्यासारखे काय वाटते आहे ?"

" तेही खरे आहे.

" आपण हिंदुस्थानातच आहोत; पण हिंदुस्थानच या साऱ्यांच्या पुढे निघाला आहे. "

आणि माझी मान अभिमानाने एकदम ताठ झाली. मला अधिक तपासणीसाठी अस्थि विभागाकडे पाठविण्यात आले.

अस्थिविभागांतही तोच सौजन्यशाली अनुभव. इथेही तज्ज्ञ डॉक्टरांची तत्पर मदत, कुशल उपचार, अॅडमिट करण्याची घाई.

सार्वजनिक क्षेत्रातील या विभागात चांगल्या घटनांची पूर्ण मालिकाच अनुभवाला येत होती. पूर्वानुभवांच्या पार्श्वभूमीवर अविश्वसनीयच वाटत होतं हे. पण समोर, प्रत्यक्ष घडत होतं. हे सहन करण्याचीही मला थोडी सवय करावी लागली.

तुम्हाला साईडरूमच हवी ना ? डॉक्टरांचा सहज प्रश्न. " हो " माझा तोंड भरून होकार.

कारण वॉर्ड म्हटलं की अंगावर शहारे असाच आतापर्यंतचा अनुभव होता.

अॅडमिट होण्यासाठी मी वर आल. मी वॉर्डमध्ये आले, वॉर्ड पाहिला आणि पहातच राहिले.

भरपूर प्रकाश असलेला, प्रशस्त हवेशीर वॉर्ड. त्याच्या भिंतींचा तो चमकदार रंग. भिंतीवर जागोजागी लावलेली सुंदर निसर्गचित्रे. आत प्रवेश करताच एका बाजूला उंच मोठा आरसा. दुसऱ्या बाजूला मोठ्ठा कुलर. जागोजागी लटकलेले पंखे आणि भिंतीवरचे घड्याळ.

मला साइडरूम घ्यायची होती हेही मी विसरून गेले होते. मी वॉर्डमध्येच प्रवेश घेतला.

आणि त्याक्षणी साऱ्या जगाला ओरडून सांगावेसे वाटले उठसुठ इथल्या सर्व गोष्टींना नाक मुरडण्याआधी आणि मुक्तपणे तोंड सोडण्याआधी इथे येऊन पहा.

जवळ पैसे नसणाऱ्यासाठी केवढी प्रचंड आणि तज्ज्ञ यंत्रणा इथे सतत कशी क्रियाशील आहे,

इथे अंधशाळेतील निराधार शालिनी उपचारासाठी आली होती. त्या असहाय मुलीवर तिच्या विरोधालाही न जुमानता सतत उपचार चालू होते.

अनेक छोटी छोटी मुले होती. धडपडणारी, पडणारी; अनपेक्षितपणे सिरियस होणारी – आणि त्यांना खडखडीत बरे करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे डॉक्टर होते.

आसपासच्या खेड्यातून उपचारासाठी आलेली छोटी छोटी मुले आणि त्यांचे हतबल झालेले पालक. इथेच झुंज सुरू होत होती व्यथेशी विज्ञानाची, कौशल्याची आणि मानवतेचे उत्तुंग मिनार खडे होत होते.

परिचारिकांचे एक पथक सतत रोग्यांच्या शुश्रूषेत दंग होते. दिवसातून अनेकवेळा सेविका सफाई करीत आणि परिणाम म्हणून वॉर्ड आतपर्यंत अगदी लखलखीत होता. स्टुडंट डॉक्टर्स, हाउस सर्जन, यांच्या अविश्रांत परिश्रमाचे राहून राहून आश्चर्य वाटत असे.

दिवस नाही रात्र नाही, अखंड श्रम. जणु रोगपीडितांना रोगमुक्त करण्याचा त्यांना सतत ध्यासच लागला होता.

रात्री आठ वाजण्याच्या सुमारास आठ वर्षाची एक बेबी अॅडमिट झाली. खेळता खेळता तिसऱ्या मजल्यावरून खाली पडली होती.

साऱ्या वॉर्डचे हृदय लक्कन् हालले. ती अगदी निपचित पडलेली होती. तोंडातून रक्त येत होते. आणि तिची आई. मी आई असल्यामुळेच तिची अवस्था समजू शकत होते. काही मिनिटातच डॉक्टर आले. मनात आशा होती. जगेल ही. हट्ट होता जगायलाच हवी.

नियती आणि माणूस यांच्यातील तीव्रतर संघर्ष सुरू झाला. तासामागून तास गेले. मोठे डॉक्टर थांबलेले होते. तिचा धोका टळला आणि मग सर्वांनीच एक सुटकेचा निश्वास टाकला होता.

आणि ती अस्थिपंजर वृद्धा, बहुसंख्य भारतीयांप्रमाणे तीही दारिद्र्याचा शाप भूषविणारी होती. शक्य तेवढा आजार अंगावर काढून झाल्यावर शेवटी नाईलाजाने तिला इथे आणण्यात आले असावे. बरोबरची मंडळी सतत डोळे गाळणारी – ऑक्सिजन ब्लड सुरूच होते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फारच थोड्या वेळाची सोबतीण असावी. पण त्याही परिस्थितीत रात्री तिला खाली नेण्यात आले. एक्सरे काढण्यासाठी. आवश्यकता भासली तर तावड-तोब ऑपरेशन करण्यात येणार होते. ती वृद्धा म्हणजे असहायतेचे आणि दारिद्र्याचे मूर्तिमंत प्रतीक होते. आणि तरीही सारे विज्ञान, सारी निष्ठा तिच्या पाठीशी उभी होती.

तिच्यात आणि मृत्यूत कणखरपणे उभा होता— हाऊस सर्जन — त्याची जिद्द त्याची तडफ, त्याचे अवि-श्रांत श्रम — पहाटे पाच वाजेपर्यंत तो झगडत होता. आणि अखेर आशाळभूतपणे वाट पहात असलेल्या मृत्यूला त्याने रिकाम्या हाती परत पाठविले होते. ती पहाट एक वेगळाच प्रकाश मनात भरून गेली.

धन्य त्याची आई ——

मनात राहून राहून येई माझा मुलगाही असाच या मोठ्या दादाचे बोट धरून चालू शकेल ?

इतका कणखर; इतका जिद्दी बनेल ? आज किती गरज आहे अशा सुपुत्रांची आपल्या भारतमातेला.

आणि मग मला एकदम त्याची आठवण झाली. माझ्याच वर्गात शिकणारा — खेडेगावातलाच पण असामान्य बुद्धिमत्ता लाभलेला — दारिद्र्याशी सर्व शक्ति-निशी झुंज घेणारा — माझ्या विद्यार्थ्यांच्यामध्ये आणि स्वत:च्या मुलामध्ये मी कधीही दुजाभाव करूच शकत नाही — त्याला इथे प्रवेश मिळला हे ऐकून केवढा आनंद झाला होता आम्हाला —

पण इथल्या काही उद्दामांच्या नृशंसतेने त्याची स्वप्ने धुळीला मिळविली होती. त्याच्या व्यक्तिमत्वाच्या चिंध्या चिंध्या केल्या होत्या. काही दोष नसताना — आणि नंतर अतिनिराशेने कित्येक वेळा आड विहीर जवळ करण्याचा प्रयत्न केला होता.

आज चार वर्षे ती जखम मनात चिघळत होती. वाईट वाटे आणि आश्चर्यही.

रॅगिंग सारख्या या अपप्रवृत्ती — काहींच मुलांच्या मनात आणि त्याही तात्कालिक असतात. मग इतक्या भयानक थराला त्या का जातात ? आणि बहुसंख्य विद्यार्थी याचा एकजुटीने प्रतिकार का करीत नाहीत ?

वेदनेने तडफडणारे इतके चेहरे समोर असताना एखाद्याला मुद्दाम यातना कां दिल्या जातात ? साहसा-करिता केवढं प्रचंड क्षेत्र इथे उपलब्ध आहे ! हे आव्हान जिद्दीने पेलणारा एखादाच ' आमटे ' कां निघावा ?

जगातल्या सगळ्याच प्रश्नांना समाधानकारक उत्तरं सापडत नसतात असे सांगून मनाला गप्प बस-विण्याचा मी प्रयत्न करते खरा ! पण मेंदूच्या चिंध्या होईपर्यंत विचार करण्याची त्याची सवय जाईल तर ना ! पण तरीही जीवन बदलत असतं — इथे तर ते फार वेगाने बदलले आहे असे मला वाटत होते.

नाही तर इथे येणारा सामान्य माणूस —

कुठे गेली त्याची निर्जीवता ? ती मग्रूरी ? तो अहंभाव आणि ते सारे निमूटपणे गिळणारा सामान्य माणूस — इथे माणसाला, अतिसामान्य माणसालाही माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळालेली दिसत होती. आणि ती फार मोठी गोष्ट होती.

रात्रीच्या वेळी मिनिट दोन मिनिट शिकाऊ डॉक्ट-रांच्या हास्याचा खळखळाट — पण हेच डॉक्टर रोगाशी झगडताना किती चिवट आणि कणखर असतात हे मी स्वत: पहातच होते — रात्रीचे २ — ३ — ४ वाजले तरीही. मला तर कधी कधी वाटतं की त्यांच्या गळ्यातला स्टेथस्कोप त्यांच्या पत्नीला सांगत असावा, बाई ग माझे लग्न लागलंय आधीच या डॉक्टरकीशी यातून जो उरेन सुरेन तो मी तुझा —

पण इतक्या अविश्रांत श्रमाने तरी प्रश्न सुटलेत कां ? निदान ते सोपे तरी झाले आहेत कां ?

सकाळी पाहिल्याबरोबर आकर्षक मांडणीमुळे डोळ्यात भरलेला तो वॉर्ड. आता त्यातील $\frac{1}{3}$ पेक्षा जास्त कॉटस्च्या पायथ्याशी फ्लोअर बेडस् घातली गेल्यामुळे अगदी गजबजून गेला होता.

इतकी चांगली व्यवस्था क्षणार्धात अपुरी ठरली होती. कां असे व्हावे ?

आमची फुगलेली लोकसंख्या ?

आमचे दारिद्र्य ?

आमचे अज्ञान ?

त्याचबरोबर समजूतदारपणाचा अभाव. आमच्या लोकसंख्येच्या मानाने अपुरा असणारा आरोग्य विभाग— तोही बराचसा शहरामधून केन्द्रित झालेला.

आणि सर्वसामान्य जनतेमध्ये आढळून येणारी आरोग्यविषयक उदासीनता, बेफिकिरपणा.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खरे तर इथे काय कमी होते ?

सकाळी ७ वाजता गरम गरम चहा. नऊ वाजता नाश्ता, मुलांच्यासाठी रसरशीत फळे, ११½ वाजता ताजे रुचकर – आणि पुरेसे जेवण. दुपारचा चहा – संध्याकाळचे जेवण.

टेबलावरचा फोन उचलला गेला की काही क्षणात डॉक्टर हजर होत.

हे सगळं पाहून वारंवार वाटे – कुणी केलं हे सारं ? या दरिद्री नारायणाची अहर्निश चिंता वाहणारं कोण होत ?

जणु जगन्नियंत्याचे प्रेमळ अंत:करणच प्रत्येक दीन दुःखी माणसाच्या सेवेला धावत होते.

हे हात – ममतेने भरलेले – कुशल शक्तिशाली, हळुवारपणे व्यथितांपर्यंत येणारे – कठोरपणे व्यथा उपटून फेकून देणारे – न कळत माघारी होणारे ? परमेश्वरासारखेच क्षणोक्षणी आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे – आश्वस्त करणारे – तरीही अव्यक्त असणारे.

हे हात – प्रेमळ, कणखर, तत्पर, मातीतून मानवाला उठवू पहात आहेत. मातीतून मानव घडवू पहात आहेत.

इथे येणारा प्रत्येक विद्यार्थी वैद्यकीय ज्ञाना-बरोबरच मानवतेचेही धडे घेतो आहे. गिरवितो आहे.

मान, सन्मान, प्रतिष्ठा, संपत्ती या साऱ्या आपाततः येणाऱ्या गोष्टी आहेत.

खरी आहे जिद्द, खरे आहेत श्रम, खरे आहे ज्ञान, खरे आहे मानवतेवरील गाढ प्रेम.

हे सारे पाहून बाहेरच्या वातावरणात मनाचे झालेले शतशः तुकडे आत कुठे तरी सांधून येत आहेत असे वाटत होते.

पण पुन्हा वाटले हे हात डगमगले तर ?

पण तेवढ्यात ट्रिटमेंट व्यवस्थित न घेतल्याबद्दल गरजणारा डॉ. चा आवाज ऐकायला आला "हे येथे चालणार नाही."

तो आवाज सांगत होता हे हात डगमगणार नाहीत. सकाळ संध्याकाळ होणाऱ्या त्या संथ आणि सज्ञानी राउंडस् त्या सांगत होत्या हे हात डगमगणार नाहीत. डॉक्टरचे कणखर हात आश्वासन देत होते, हे हात डगमगणार नाहीत. डॉ. चा प्रेमळ आश्वासक आवाज सांगत होता हे हात डगमगणार नाहीत.

परिचारिकांचे सर्वत्र चपळपणे फिरणारे हात, वेधक शोधक नजर, सांगत होती हे हात डगमगणार नाहीत. इंचार्ज स्टाफची अनुभवी कामसू प्रेमळ दृष्टी सांगत होती हे हात डगमगणार नाहीत.

या साऱ्यांच्या अविश्रांत श्रमावरच तर हे सारे उभे होते.

या साऱ्या क्रियाशील कर्तृत्ववान लोकांच्या हाती माझे जीवित सुरक्षित होते. आणि माझ्या देशाचा भविष्यकाळही.

अचानक माझे लक्ष बाहेर गेले. खिडकीतून एक प्रचंड झाड डोकावताना दिसत होते.

गर्द, हिरवेगार, तेजस्वी, रसरशीत. आपल्या लालसर गुलाबी शेंगांनी चमचमणारे.

नजरेतील व्यथा शोषून घेऊन हास्य शांति बहाल करणारे.

एकच नव्हे अनेक खिडक्यांमधून अशी रसरशीत झाडे डोकावत होती.

मन समाधान पावले होते. कारण अखेर ते घर, ते आवार, ती झाडे, सारे काही मला सापडले होते – या क्षणी ते माझेही घर होते.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बहिणाईची गाणी : एक नवे आकाश

श्रीकांत तिडके

कविता हा लययोग आहे. कवीराला तो साधला होता. गोपी तरी कुठे अध्यात्म शिकायला गेल्या होत्या ? पण त्यानाही तो ' लययोग ' साधला. म्हणून कृष्ण कळला. वर्षोनुवर्षे पुस्तके पाठ करणाऱ्यांना तो कळत नाही, गवसत नाही. उत्कट प्रीतीतूनच हा लययोग साधतो, असे कवी बोरकरांनी म्हटले आहे. (कथा सृजनाची प्रभाकर अत्रे) ह्या त्यांच्या काव्यविषयक मताचे प्रत्यंतर बहिणाईच्या कविता वाचून येते. बहिणाईची गाणी खडकातून उचंबळून येणाऱ्या झऱ्यासारखी आहे. प्रतिभाशक्ती हे कवीला निसर्गाचे देणे आहे. असे देणे बहिणाबाईला लाभले होते आणि म्हणूनच, बहिणाईचे बोलणे, गाणे झाले.

बहिणाईची गाणी वाचताना त्यातील निसर्ग प्रतिमांनी मन भारावून जाते. त्यातील शब्दसौंदर्याच्या परिमळात मन धुंद होऊ लागते. आणि त्यावरोबरच आशयाच्या चित् आनंदात रसिकाची ' समाधी ' लागते. भारतीय साहित्यशास्त्रात रस अलौकिक का ? या संदर्भात सांगितले आहे की ज्या कलाकृतीला सामोरे जातांना ' परमित प्रमातृत्व ' गळून पडते तेच अलौकिक साहित्य. बहिणाईची गाणी वाचताना लौकिकाचे भान सुटते. मन अलौकिक अशा भावविश्वात रंगून जाते. आणि म्हणूनच बहिणाईची गाणी वाचून ' हा तर शेतात सापडलेला सोन्याचा हंडा आहे ' असा आनंदोद्गार आचार्य अत्र्यांच्या तोंडून निघाला होता.

बहिणाईला अचाट कल्पनाशक्ती लाभली होती. शब्द संपत्तीची खाण तिच्यापुढे हात जोडून उभी होती. इतके हे समर्थ कवित्व. आणखी महत्वाचा विशेष असा की हे कवित्व जीविताच्या सुंदर तत्त्वज्ञानावर उभे आहे. हे तत्त्वज्ञान कोणते ? त्या तत्त्वज्ञानातील जीवनदृष्टी कोणती ? ही अभ्यासनीय बाब आहे. व याच भूमिकेतून बहिणाईच्या गाण्याचे हे आकलन.

चिद्‌विलासवादी दृष्टिकोन

बहिणाई साक्षात्कारवादी कवयित्री होती. साक्षात्कारवाद हे काही एखादे पोथीनिष्ठ, साचेबंद तत्त्वज्ञान नाही. तर तो एक स्वभावविशेष आहे. ती एक मनोवृत्ती असते, एक जीवनदृष्टी असते. साक्षात्कारवादाचा प्रख्यात समीक्षक कॅरोलाईन स्पर्जन म्हणतो, ' Mysticsm is in truth, a temper rather than a doctrine, an atmosphere rather than a system of Philosophy. ' (अंत:प्रेरणेवर, आत्मप्रतीतीवर बव्हंशी अवलंबून असणाऱ्या साक्षात्कारवादी मनोवृत्तीचे मूळ मनुष्यस्वभावातच आहे. या नश्वर जगाच्या मुळाशी एखादे शाश्वत तत्त्व हे असलेच पाहिजे. अशी त्यांची दृढ धारणा असते.) बहिणाबाईच्या कवितांचा विचार ह्याच भूमिकेतून करणे श्रेयस्कर आहे.

बहिणाबाई साक्षात्कारी कवयित्री. तिला वस्तूवस्तूंमधून चैतन्य सागरावरील लाटांचे दिव्य संगीत ऐकू येत होते. आणि म्हणूनच ही निरक्षर बाई

' देवाचं दर्सन झालं
झालं आपसुक
हिरीयात सूर्यबापा दाये
दाये अरूपाचं रूप.
तुह्मा पायाची चाहुल,
लागे पानापानामधी
देवा तुझं येनं जानं
वारा सांगे कानामधी-- '

असा चित्‌आनंद भोगत होती. त्या आनंदाची चिरसुंदर चित्रे रेखाटीत होती.

संत ज्ञानेश्वर चिद्‌विलासवादी होते. त्यांच्या जीवित तत्त्वज्ञानाचा गाभा ' चिद्‌विलास ' हाच होता. चैतन्यतत्त्व हे स्फूर्तिमय आहे व विश्व हा त्याचा विलास आहे. जगातील नानाविध नामरूपांनी परमात्मा नटला आहे व म्हणूनच परमेश्वराच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दर्शनासाठी जग बाजूला सारण्याची गरज नाही. विश्वामध्येच 'विश्वात्म्याचा' शोध घेता येईल असे ज्ञानेश्वर आवर्जून सांगत होते. अमृतानुभवात तर याच चिद्‌विलासवादाचे निरूपण व विवरण आहे. ज्ञानेश्वर संत होते. त्यांनी विषयासक्तीचा जरी निषेध केला असला तरी शब्द, स्पर्श, रूप, गंधात्मक सृष्टीचा विटाळ मानला नाही. बहिणाईची कविताही अशी रंग, रूप, गंधात न्हाऊन निघाली आहे. पण आधुनिक कवीच्या कवितेसारखी ती केवळ इंद्रियनिष्ठ अनुभूती-वरच उभी नाही. तिला चैतन्यशक्तीचा ध्यास आहे.

किती रंगविशी
रंग भरले डोयात
माझ्यासाठी शिरीरंग
रंग खेये आभायात

सगळे रंग, स्पर्श, गंध हे परमेश्वराचे अस्तित्व सुचविणाऱ्या शुभखुणा आहेत असे बहिणाबाईला वाटत होते.

जीवनाचा अर्थ

ह्या जीवनाचा नेमका अर्थ काय ? त्याचा आदि, अंत कुठे आहे ? ह्याचे नेमके उत्तर कुणाला सापडले आहे ? शेवटी मोठ-मोठ्या ऋषीमुनींनीही 'नेति-नेति'च म्हटले आहे. पण ह्या अतर्क्य, अगम्य जीवनाचा साधा नि सोपा अर्थ बहिणाबाईंनी लावला आहे. हे जग ईश्वराचे निवासस्थान आहे, इथे रडत काय बसायचे ?

येरे येरे माझ्या जीवा
काम पडलं अमाप
काम करता करता
देख देवाजीचं रूप

किंवा

हास हास माझ्या जीवा
असा संसारात हास
इडा पीडा संकटाच्या
तोंडावऱ्हे काय फास

बहिणाईच्या ह्या ओळी पति-निधनानंतरच्या आहेत. वैधव्य ही भारतीय स्त्रीच्या अस्तित्वाला समूळ धक्का देणारी घटना. पण दुःखाच्या कड्यावर उभी असतानाही बहिणाईचा तोल कधी जात नाही. आणि त्या दुःखातही ती म्हणते 'काम पडलं अमाप'. निष्काम कर्मयोग-कर्मयोग म्हणतात तो हाच. कवयित्रीच्या लेखी जगणं-मरणं फारशा भिन्न गोष्टी नाहीतच. मरणाच्या 'संध्याछाया' बहिणाईला भिववू शकत नाहीत. कारण जगण्या-मरण्याची सरळसोट व्याख्या तिने करून ठेवली आहे.

आला सास, गेला सास
जीवा तुझं रे तंतर
अरे जगनं-मरनं
एका सासाचं अंतर

जगणे आणि मरणे यांत अंतर किती ? तर फक्त एका श्वासाचं. ह्या अतर्क्य, गूढ जीवनाचा एवढा सुलभ अर्थ बहिणाबाईंनी सांगितला व म्हणूनच जीवनातील दुःखाचा सागर पिऊन सुखाचे पक्षी आसमंतात उडविण्याची दुर्दम्य आकांक्षा काव्यात प्रगटली.

माझं दुःख, माझं दुःख
तयघरात कोंडले
माझं सुख, माझं सुख
हांड्या झुंबर टांगले

जीवनाच्या प्रवासात असे सुखाचे 'हांड्या झुंबर' टांगणारी, आनंदाची वाटिका फुलविणारी ही कवयित्री.

प्रतिमासृष्टी

बहिणाबाईच्या कवितेत कल्पनासौंदर्य आहे. तरल संवेदनक्षमता आहे. आशयानुरूप अभिव्यक्तीबदल बहिणाईला साधतो. पण याहीपेक्षा या काव्यसौंदर्यातील जमेची बाजू आहे त्यातील प्रतिमासृष्टी. बहिणाईची गाणी वाचताना झरझर सगळा चलत्‌चित्रपट डोळ्या-पुढे उभा राहतो. कापनी (कापणी) कवितेत 'आता लागे मार्गेसर, आली कापनी कापनी' ह्या ओळीनंतर.

पडले जमीनीतले तडे
आली कापनी कापनी
तशी माझ्या डोळ्यापुढे
उभी दान्याची मापनी

किंवा रगडनी (मळणी) कवितेत

पाय उचल रे बैला
कनुसाचा कर भूसा
दाने एकाएकातून
पडतील पसापसा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'कापनी', 'रगडनी' सारखीच दृश्यचित्रे 'उपननी' व 'मोट हाकलतो एक' या कवितेत डोळ्यापुढे उभी राहतात. त्यांच्या कवितेतून प्रादेशिक प्रतिमा साकारतात. पण कवितेतील आशयाला कधीच प्रादेशिकतेची सीमा निर्माण होत नाही. विश्वातील विश्वानंदाचा ध्यास बहिणाबाईला लागला होता. व म्हणूनच चराचरातून त्यांनी चित्शक्तीतील स्थित्यानंद भोगला.

माणुसकीला आवाहन

बहिणाईला सर्वात चीड आहे ती माणसाच्या स्वार्थातून निर्माण झालेल्या कृतघ्नपणाची. केवळ लोभामुळे तू माणूस असूनही 'काणूस' म्हणजे पशू झाला आहेस, असे त्या सर्व मानवसमाजाला म्हणतात. माणसातील सैतानत्वाची निर्भत्सना करताना त्या निर्भर्त्सनेमागील कवयित्रीच्या मनात असलेली अपार करुणाही दिसते.

मानसा मानसा
कधी व्हशील मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानूस !

माणसाला त्याचे 'माणूसपण' लाभावे, नराचा नारायण व्हावा म्हणून संत धडपडलेत. संतांच्या (मराठी) कार्याची पताका खांद्यावर घेऊन निघालेली ही मराठमोळी बाई माणसाच्या मानवत्वाला आवाहन करते. त्यासाठी मनाला आवर घालून, विश्वचैतन्य पाहण्यासाठी 'पापणी' जागी ठेवण्याचा सल्ला देते.

मन पाखरू पाखरू
त्याचा काय सांगू मात ?
आता व्हतं भूईवर
गेल गेल आभायात . .

असं सांगून मनाच्या चंचलत्वातील पाऱ्याला आपल्या शब्दाच्या चिमटीत त्या नेमके पकडतात.

प्रवृत्तीवादी कवयित्री

वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रात आध्यात्मिक जागरणाचे कार्य केले. वारकरी परंपरेच्या खुणा शिष्ट समाजापेक्षा खेडूतांनी ब्रीद म्हणून जोपासल्या आहेत. बहिणाईच्या काव्याचे नाते संतांच्या अभंगाशी आहे. विरक्ती व निवृत्तीवादाची कास धरणाऱ्या सर्वच मराठी संतांवर 'राष्ट्राला समाजविन्मुख' केल्याचा आरोप काही अभ्यासक करतात. पण बहिणाबाईवर हाही आरोप घेता यावयाचा नाही. कारण बहिणाई सश्रद्ध असूनही तिने संसाराचा, जीवनाचा धि:कार केला नाही. किंवा जीवनापासून पळून जाण्याची भूमिका कधी स्वीकारली नाही.

कधी नगद उधार
सुख दु:खाचा वेपार
अरे संसार संसार
असा मोठा जादुगार

तर अशी जीवनाकडे पाहण्याची डोळसता त्यांनी स्वीकारली.

'खोप्यामधील खोपा' कवितेत सुग्रण पक्षिणीच्या प्रयत्नपूर्वक केलेल्या खोप्याची मन:पूर्वक प्रशंसा करून बहिणाई म्हणते, 'पाखराची कारागिरी, जरा देख रे मानसा' आणि पुढे जाऊन,

तीची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले देवानं
दोन हात दहा बोट

अशी प्रयत्नशीलतेची कास बहिणाईने आपल्या कवितेत धरलेली दिसते.

'बहिणाईचे अनुभवविश्व'

बहिणाई निरक्षर होती. जात्यावर बसून गाणी म्हणायची. शेतातील हिरव्या पिकाकडे पाहत काहीतरी गुणगुणायची. आपल्या गावाच्या, खानदेशच्या भौतिक सीमेपलीकडे कधीही न गेलेली ही बाई. शेतीशी असलेले तिचे व्यावसायिक नाते जिव्हाळ्यात परिवर्तित झालेले दिसते. 'शेताच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो' अशी ना. धो. महानोरांसारखी शेतीशी 'एकतानता' बहिणाईची झाली आहे. शेतीशी कवयित्रीच्या मनाचा संवाद साधल्यानेच काव्य आजही टवटवीत वाटते.

चिद्विलासवादी दृष्टीमुळे अनुभवविश्व आकाश-मातीला छेदून जाणारे झाले. जगाच्या पाठशाळेत अनुभव गाठीला बांधण्यासाठी ही खेडूत महिला कुठे बरे गेली होती ? पण जीवनाच्या मंगल तत्त्वज्ञानावर तिची निष्ठा असल्यानेच तिच्या काव्यातील अनुभव-विश्व प्रसरणशील झाले आहे. तिच्या कवितेतील आशय अथांग आकाशासारखा झाला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंगळसूत्र

पुरुषोत्तम रोहणकार

सोनेरी फ्रेम मधला सुलभाचा सुन्दर फोटो पाहात माझ्या डोळ्यांत आसवं जमा झाली. वेळ दुपारची. रोजच्याप्रमाणं, खोली आतून बंद करून मी पलंगावर पडल्या पडल्या फोटो पाहात होतो. छोटी पुष्पा कॉन्व्हेंट स्कूल मध्ये गेली होती. एकटाच खोलीत मी पडून होतो.

सुलभाचा फोटो पाहात गतस्मृतींच्या कॅलेंडरांची पाने फडफडली.

अशीच ती दुपार होती. एकटाच खोलीत मी मासिक वाचत बसलो होतो.

अचानक हाक ऐकू आली,

" पोष्टमन !"

मी दार उघडलं. पोष्टमननं माझ्या हाती एक गुलाबी पाकीट दिलं.

" एकनॉलेजमेंटवर सही करा–"

" रजिष्टर लेटर आहे वाटतं ?"

" अर्थात !"

मी सही केली. एकनॉलेजमेंट घेऊन पोष्टमन चालता झाला.

पाकिटाच्या डाव्या बाजूला प्रेषक म्हणून 'जिल्हा – परिषद, रत्नागिरी' असा रबर स्टॅंप उमटलेला होता...

मी आतून दार बन्द केलं. आणि पलंगावर आलो. पाकीट फोडलं. त्यात नोकरीची ऑर्डर होती. गेल्या महिन्यांत मी कारकूनासाठी अर्ज केला होता. त्याचा इंटरव्ह्यू मागेच आटोपला होता. आता नोकरीची ऑर्डर आली होती.

माझा आनंद हृदयात मावेनासा झाला.

आत्तापर्यंत नोकरीची वाट पाहात मी कंटाळून गेलो होतो. आज तो सुयोग आला होता. मी खुषीत होतो. परवा म्हणजे एक तारखेला मला कामावर हजर व्हायचं होतं.

त्या दिवशी, चांगले रुबाबदार कपडे करून मी ऑफीसला गेलो.

ऑफीस फार मोठं, पण आमची खोली छोटी होती. चार टेबलं होती – चार कोपऱ्यात. दोन माणसं - त्यापैकी एक हेडक्लर्क – एक तरुण मुलगी आणि चौथा मी !

ऑफीसचा पहिला दिवस असल्यामुळे मला कसंतरीच वाटत होतं. त्या ३० × ४० च्या खोलीत गुदमरल्यासारखं होत होतं. बरं, कुणाशी बोलावं तर दोघंही माणसं अनोळखी. तिसरी ती बाई... मोठी पंचाईत झाली माझी – शेवटी हेडक्लर्क माझ्याशी बोलले.

" काय नाव आपलं ?"

" जोशी !"

" येथेच राहता ?"

" हो !"

तेवढ्यात, ती बाई फाईल घेऊन त्यांच्या समोर आली. ते फाईल पाहूं लागले.

बाई दिसायला देखणी होती. जास्तीत जास्त वीस वर्षाचं वय असावं. पांढरीशुभ्र साडी अन् तसंच ब्लाऊज...गळ्यात लांबलचक मंगळसूत्र...

तिच्या मंगळसूत्रावर माझी नजर स्थिर झाली. बाई लग्न झालेली आहे तर – हा विचार विजेसारखा माझ्या मनांत चमकून गेला.

पण निदान खोलीत 'करमणूक' आहे, एवढं समाधान वाटलं.

पहिला दिवस तसाच गेला.

दिवस रात्रीच्या रुळांवरून काळाची आगगाडी धावूं लागली.

पाहता–पाहता वर्ष निघून गेलं.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आता ते ऑफीस माझ्या अंगवळणी पडलं. दोस्त मित्र झाले. ऑफीसच्या कामांत मीही तरबेज झालो. अन् योग पहा, माझं प्रमोशन झालं. साध्या क्लर्कचा हेडक्लर्क झालो. साहाजिकच माझ्या हाताखाली काम करणाऱ्या माणसांचा संबंध माझ्याशी येऊ लागला. त्या बाईचा सुद्धा !

एक दिवस, अचानक मी आजारी पडलो. ऑफिसातून, रिक्षात बसून मी घरी आलो. अंगात ताप चढला होता. डॉक्टरनं 'टायफाईड' असल्याचं सांगितलं होतं...

गेल्या आठ दिवसांपासून मी या छोटया खोलीत पडून आहे. करमत नाही. एकलेपणानं अधिकच मनाला बेचैन वाटतं. पण करणार काय ?

एका दुपारी, अचानक दारावरची साखळी वाजली.

"कोण ?"

"मी आहे – सुलभा दीक्षित..."

ही बाई ऑफिसमधून कशी आली, हा विचार मी दाबला. व म्हटलं, "या...या मिसेस दीक्षित."

ती आत आली. पलंगाला लागून खुर्ची होती. त्यावर ती बसली.

"कशी आहे तब्येत ?"

"आहे तशीच आहे. काही फरक नाही." मी हसण्याचा प्रयत्न करीत म्हणालो. तिच्या चेहऱ्यावर निराशा झळकली.

"ऑफिसमधून आलात ?"

"नाही – मी आज रजा घेतली. मुद्दाम तुमच्या भेटीसाठी."

भेटीला आलेली ही ऑफिसातील बाई...तिला कपभर चहा घ्या म्हणणं, हे माझं कर्तव्य होतं.

"चहा ?"

"नको–नको !"

"का ?–माझीही औषधी घेण्याची वेळ झाली. मलाही मिळेल तुमच्याबरोबर–"

"तुम्ही आराम करा. मी करते चहा."

"तुम्ही ? पण..."

"काय हरकत आहे."

तिनं चहाचं सामान काढलं.

थोडयाच वेळांत, आम्ही दोघांनी चहा घेतला.

त्यानंतर ती एकदा नव्हे, अनेकदा माझ्याकडे आली. तिनं खूप माझी काळजी घेतली. का कोण जाणे, मलाही तिच्याविषयी आपुलकी वाटू लागली.

लवकरच मी आजारातून बरा झालो. पण अशक्तपणा खूप होता. त्यामुळे ती मला 'अंडे' खाऊ घालू लागली. माझ्या तब्येतीला जपू लागली.

तिला पाहात माझ्या मनांत विचार यायचा, या सुलभाचं लग्न झालं. पण संसारांत सुखी दिसत नाही ती ! नवऱ्याचं अन् तिचं पटतं नसावं. नसतं पटत एखाद्याचं. कित्येक वेळा ती आपल्या घरी आली. पण स्वतःहून तिनं कधी आपल्या घरची गोष्ट सांगितली नाही. आपणही कधी विचारली नाही. कशाला विचारायचं ? उगीच विचारीला दुःखाच्या डागण्या कां ?

तिचा आपल्यावर जीव आहे – हेच पुष्कळ झालं. या गोष्टीचा फायदा घ्यायचा मी ठरवलं. त्या रात्री, नेहमीप्रमाणे ती माझ्या खोलीवर आली. धुतलेले हात-पाय मी टॉवेलाला पुसत होतो. ती माझ्या बाजूला उभी राहिली. अचानक दिवे गेले. तसा मी तिचा हात पकडला. वाटलं, ती हर्षानं माझ्या गळ्यात हात टाकील.

"सोडा माझा हात...सोडा म्हणतेय ना—"

"नाही सोडत—"

"चावा घेईल मी—"

तेवढ्यात अचानक दिवे आले. मी तिचा हात सोडला. वाटलं, ही कधी पुन्हा आता आपल्या खोलीवर यायची नाही. पण तसं घडलं नाही. ती नेहमीप्रमाणे रोज यायची. मलाही समाधान वाटलं. एक दिवस मी तिला म्हणालो,

"तू माझ्या बायकोसारखी काळजी घेतेस ?"

ती हंसली. तिच्या गोऱ्या गुलाबी गालांवर गोल गोड खळी पडली. पांढरे शुभ्र दात जाईच्या कळ्यां-सारखे भासलेत.

"अशीच काळजी तू तुझ्या नवऱ्याची घेत असशील ?"

"अर्थात !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही गोष्ट कां कोण जाणे, मला आवडली नाही. पुढे मी तिला काही विचारलंच नाही. काय विचारणार? दुसऱ्याची बायको ती..तिच्यावर आपला काय अधिकार?

मी गप्पच राहिलो. तिचा नाद सोडायचा, एवढं मी पक्क ठरवलं.

तिनंही तसंच ठरवलं असावं. कारण त्या दिवसानंतर बरोबर पंधरा दिवस तीं माझ्याकडे आलीच नाही. ऑफिसात सुद्धा, — माझा संबंध येऊ नये म्हणून!

पण चौकशी अंती समजलं की ती आजारी आहे. तेव्हा माझं मलाच फार वाईट वाटलं. संध्याकाळी मी तिच्या घरी गेलो. माझी कल्पना होती, तिच्या घरी तिचा पती, दीर, नणंद – सासूसासरे असतील. पण ती एकटीच होती. पलंगावर पडल्या पडल्या 'ऊन–सावली' कादंबरी वाचत होती. तब्येत फारच खालावली होती.

"काय म्हणते तब्येत, मिसेस दीक्षित?"

ती हसली. त्या हसण्यात कमालीचा गोडवा होता. हर्षाची किनार होती.

"तब्येत चांगली आहे."

मी थोडा वेळ गप्प राहिलो.

आपल्या विशाल व विपुल काळ्याशार केसांची वेणी वक्षस्थळांवर घेत ती म्हणाली,

"एक गोष्ट सांगू—रागावणार नसाल तर –"

"सांग नं –"

"तुम्ही मला मिसेस दीक्षित म्हणत जाऊ नका."

"कां? तुझं लग्न..."

"झालंच नाही—" मंगळसूत्राशी चाळा करीत ती म्हणाली.

"मग हे मंगळसूत्र?"

"समाजाच्या विषारी नजरा चुकविण्यासाठी, मी हे मंगळसूत्र बांधलं."

मी तिला थक्क होऊन पाहातच राहिलो.

"कुमारी सुलभा ऐवजी मिसेस दीक्षित नावानेच नोकरीत शिरले. हे मंगळसूत्र गळयात बांधलं. तेव्हा कुठं मला माझं जीवन जगणं सुसह्य झालं."

तिनं लांब सुस्कारा सोडला.

"आजच्या जमान्यात एकटी तरुण मुलगी कसं जीवन जगत असेल याची कल्पनाच केलेली बरी. आई-वडलांनी नुसता जन्म दिला."

"कुठे आहेत आईवडील?"

"कुठे आणि कोण? काही माहीत नाही मला. लहान होती तेव्हा मला कुणी तरी अनाथालयात आणून सोडलं. तिथंच लहानाची मोठी झाल्ये. एका साहेबाच्या घरी मोलकरीण राहिल्ये. अन् शिकले. तीन वर्ष होताच नोकरीवर लागले."

आता माझ्या डोळ्यांसमोर मिसेस दीक्षित नव्हे, कुमारी सुलभा दिसू लागली.

कुमारी सुलभा!

सुडौल शरीर..गौरवर्ण..मत्स्याकृती टपोरे डोळे..सफरचंदी गाल, आर्यलंडमधल्या पोवळ्यासारखे दिसणारे लाल चुटूक ओठ..यामुळे सुलभा अशी दिसत होती जणूं रतीची प्रतिकृतीच!

मी मूळ मुद्दा काढला,

"सुलभा, आता आपण दोघंही नोकरीवर आहोत. एकाच ऑफिसात..गेल्या दोन वर्षांपासून आपण एकमेकांना फार जवळून ओळखतो. तुझी इच्छा असल्यास.."

"काय? बोला न्—"

"वाईट नाही ना वाटणार..?"

"छे!

"आपण जीवनभर एकमेकांचे होऊ –"

तिचे डोळे आनंदानं लकाकले. तिनं माझा हात आपल्या गालावर ठेवला. अन् अतिसुखाच्या भाराने तिने आपल्या पापण्या मिटल्या.

लवकरच आम्ही 'पिवळे' झालो. गुण्यागोविंदानं आमचा सुखी संसार सुरू झाला.

एक वर्ष निघून गेले.

एक दिवस अचानक मी मोटारखाली सापडलो. त्या ॲक्सिडेंटमध्ये एक पाय अन् एक हात गेला. साहाजिकच माझी नोकरी सुटली. आता घरी बसून राहावं लागतं, – सुलभावर भार होऊन..पण मला हे पटत नाही. माझं काहीही होवो. पण सुलभाच्या जीवनाची माती कां? ती सुरेख आहे. तरुण आहे. तिला दुसरा नवरा मिळू शकतो. ही टोचणी मनाला सारखी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

टोचत होती. आपल्यासारखा अपंग, घरबशा, ऐतखाऊ नवरा कुणाला हवाय् ? शेवटी एक दिवस मी गोष्ट काढली,

" सुलभा, – एक गोष्ट तुला सांगतो – रागावू नको. मी हा असा अपंग झालो. नोकरी करता येत नाही. कुठे जाता येत नाही. तुझ्यावर भार होऊन मला जीवन जगायचं नाही. तुझी इच्छा असल्यास तू दुसरा नवरा करू शकतेस. . . "

त्यावर ती खूप चिडली. रागावली. रडलीही !

आवेश ओसरल्यावर ती समजावणीच्या सुरात म्हणाली,

" माझ्या राजा ! असं कधी बोलायचं नाही. मी तुमच्या नांवानं मंगळसूत्र बांधलं. ते तसंच राहू देईल. कितीही त्रास पडला तरीही ! आता तुम्हीच माझे सर्वस्व आहात – देवही तुम्हीच आहात, मंदिरही अन् पूजाही— "

माझ्या डोळ्याला धारा लागल्या. तिनं बाळा-सारखं मला छातीशी धरलं. मायेनं अंगावरून हात फिरवला.

योग पहा, लग्नाच्या दुसऱ्या वाढदिवसाला आमची मुलगी साक्षीदार म्हणून हजर झाली. आमच्या प्रीतवेलीचं प्रथम पुष्प म्हणून मी तिचं नांव ' पुष्पा ' ठेवलं. सुलभानंच माझ्या पसंतीचं नांव ठेवायला सांगितलं होतं. पुष्पा ! तिला भारी आवडलं हे नांव !

पण नियतीला कुणाचं कधी बरं बघवत नाही, हेच खरं !

अचानक शहरांत कॉलऱ्याची साथ आली. त्या साथीला सुलभा बळी पडली, सुलभा वाचून मी अन् पुष्पा पोरके झालो.

काही दिवस मी विचार केला, आपणही जहर खाऊन सुलभाला गाठावं. कायमची ही दुनिया सोडावी. पण पुष्पा. . ?

पुष्पाला अनाथालयात सोडून द्यावं. सुलभा-सारखंच. . .

सुलभासारखेच हाल होतील तिचे. . नको. . पुष्पाचे असे हाल व्हायला नकोत.

मी मरणार नाही. जिवंत राहील. पुष्पासाठी तरी !

आता पुष्पा माझी जीव की प्राण आहे. लाईफ इंशुअरन्सच्या पैशावर आम्ही आमचे जीव जगवतो आहोत. आता ती इंग्रजी दुसऱ्या इयत्तेत शिकते आहे. तिला शिकवायचं आहे. लहानची मोठी करायची आहे. लग्न करायचं आहे. तिचा सुखी संसार बघायचा आहे.

ते कर्तव्य आहे माझं. त्यासाठीच मी जिवंत राहील.

सुलभाचा फोटो पाहात, दुपार केव्हा टळली, ते मला समजलंच नाही. पापण्यांच्या कातरीनं आसवांची माळ कापून मी तो फोटो हृदयाशी धरला.

लेखकांना विनंती

साहित्य कागदाच्या एका बाजूला, सुवाच्य अक्षरांत, पुरेसा समास सोडून

मराठी साहित्य महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांनुसार असावे. सोबत पुरेसे टपालहशील व स्वतःचा पत्ता लिहिलेला लिफाफा असेल तरच नापसंत साहित्य परत पाठविले जाईल. त्याविषयी कोणताही निराळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. कवींनी टपालहशील पाठवू नये. नापसंत कविता निकालात काढल्या जातील.

साहित्यावर निर्णय दोन महिन्यांत घेतला जाईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रस्ते

निरंजन उजगरे

जे रस्ते माझे नाहीत,
त्यांच्याकडे आशाळभूतपणे पहाण्याची,
चूक पुन्हा करणार नाही—
नक्की ठरवलं !

उशिरा कळलं,
रस्ते नसून माझ्यासाठी,
मीच होतो रस्त्यांसाठी—
माझ्या नसा–नसांतून पदरव होता,
असंख्य अप्राप्य रस्त्यांचा

रस्ते माझ्यात,
मी रस्त्यात !

चंद्र ओळखीचा होता !

दे. शि. दुधलकर

चंद्र ओळखीचा होता
झुके पायाशी आभाळ
फुटे हुंकार जगाला
सरे नसातलं बळ

धावे पाठीशी पुण्याई
जशी गाय वासराची
दिसे 'माणूस' डोळ्यांना
जाण पायाला पायाची

नक्षत्रांच्या दिमाखाचा
बुडे काळोखात नूर
उभे उद्याचे मुजरे
स्वागताला सीमेवर

एक गझल

सतीश इनामदार

लाख गाणी गाइली मी हे जरासे वेगळे
आज का गाण्यात माझ्या रक्त माझे ओघळे ?

जन्मलो तेव्हाच झालो दीन आणि ऽ पोरका
बांधण्याआधीच का उध्वस्त झाली राउळे ?

वांझ रस्ते सोबतीला वांझ सारे गावही
वेध का घेतात माझा ही विषारी वादळे ?

काय ही माझ्याच भोती पेटली माझी चिता ?
आत मी करपून गेलो हे न कोणाला कळे !

माझिया डोळ्यांपुढे आयुष्य माझे पेटले
पाहतो माझ्याच मी का मृत्युचे हे सोहळे ?

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आयुष्य

पुरुषोत्तम बोरकर

आयुष्यासंबंधी बोलायचे काय नुसतेच पावसाळे गळत गेले
मागे वळून पाहायचे काय नुसतेच रस्ते वळत गेले
एकेक बेरीज चुकत गेली चुकत गेली वजाबाकी
दु:खसागराचा तळ येताच बेईमान झाली साकी
रिकामी ओंजळ तरीही पाणवठ्यांनी नाकारले पाणी
कलेवरच्या वस्त्रासारखी देहास लपेटली गूढ गाणी
ठरवित गेलो एक होत राहिले काही बाही
मनांत असूनही सारेच जुळविता आले नाही
स्वप्नातले घर ढासळत गेले; गेले होते नव्हते तेही
फाटके आभाळ हाती घेऊन माझा मीच माघार घेई
साऱ्याच वाटा आडवाटा अदमास कशाचा घ्यावा
रोज नव्या इच्छेला रोज नवा खांदा द्यावा
जगण्याचे बहाणे शोधताना साक्षीपुरावे पाठ झाले
आयुष्यासंबंधी बोलायचे काय नुसतेच पावसाळे गळत गेले.

चंदनी दारात

सतीश इनामदार

चंदनी दारात कोणी लाविल्या या दीप ओळी
पेटलो आम्ही इथे अन् रंगली यांची दिवाळी

मस्तकी यांच्या टिळे हे आमुच्या रक्तार्णवांचे
प्राक्तनाचे शाप येथे आमुच्या कानी कपाळी

कोण हे आले कुणी हे बांधले प्रासाद येथे
भव्य ज्यांच्या सावलीला आमुच्या उध्वस्त चाळी

रेशमी वस्त्रास यांच्या गंध ओल्या कस्तुरीचा
नागडे आम्ही इथे ही घेउनी हातात झोळी

साचला यांच्या बुडाशी घोर हा अंधार सारा
का दिवे जाळून व्हावी काजळी, ही दूर, काळी

फेकल्या काडया तुम्ही ज्या आमुच्या गर्भात व्याल्या
सूर्य हे लाखो उद्याची साजरी करतील होळी !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आगळ्या कवीचे मनाचे श्लोक–

यशवंत पाठक

मनाचे श्लोक म्हटले की समर्थ रामदासांचे नाव डोळ्यापुढे येते. किंबहुना 'मनाची शते ऐकता दोष जाती' असे समर्थ वाणीने सांगणारे समर्थ म्हणजे मनोबोध किंवा मनाचे श्लोक असे समीकरण झाले आहे. समर्थांनी मनाला केलेला उपदेश वर्तमानाचे संदर्भ ध्यानी घेऊन केला आहे. आजच्या काळातही मनाचे श्लोक मनाच्या टवटवीतपणासारखे नित्य नूतन वाटतात. अशाच प्रकारचा प्रयत्न प्रसिद्ध पंडित कवी विठोबाअण्णा दप्तरदार यांनी 'सुश्लोकलाघव' या ग्रंथात केला आहे. समर्थांइतके श्लोक विठोबाअण्णांनी लिहिलेले नसले तरी थोडक्या श्लोकात मनाच्या श्लोकातील आशय स्पष्टपणे व ठाशीव स्वरूपात निवेदिला आहे. ह्या प्रकरणात त्यांनी सुमारे दहा ते पंधरा श्लोकांपर्यंत मनास उपदेश केला आहे. मन हे चंचल आहे ही गोष्ट आजला कोणीही नाकारीत नाही. मोठमोठ्या सिद्धहस्तांनी मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला पण, त्याचा ठाव लागला नाही. मनाचा तळ शोधण्याच्या खटाटोपात विठोबाअण्णांनी मनाचे मानसशास्त्र कसे असते त्याविषयी सुंदरसे दिग्दर्शन केले आहे. यासाठी 'पंचत्वोत्तरं मनश्चंद्रमसि लयो भवति' या श्रुतिवचनाचा मार्मिकतेने उपयोग केला आहे.

'चित्त हे चंद्रापासून झाले आहे व त्याचा लयही चंद्रातच होतो या आधारे मनाची उभारणी थाटली. चंद्र उगवला म्हणजे समुद्राला भरती येते, ही गोष्ट कवी संसारसागराला उधाण येते या अर्थाने योजतात. चित्ताची चंचलता दाखविण्यासाठी त्यांनी योजलेली 'चापलता' ही प्रतिमा अर्थपूर्ण वाटते. 'चापलता' म्हणजे चपळपणा असलेला. 'चाप-लता' असा श्लेष करून धनुष्यरूपी वेल ज्याच्या हातात आहे असा श्रीरामचंद्र. याचा अर्थ इतर ठिकाणी एकरूप होण्यापेक्षा प्रभुपदी एकरूप होण्याची विनंती कवी करतो.

मनोऽसि सांतं भज तद्यनंतं क्षयालसं चंद्रमसं जहीहि ।
स हि स्वयं सांत इति प्रशस्तं धत्ते सदाऽनंतपदावलंबम् ।।

हे मना ! तू कसा आहेस ? तर 'सांत' स + अंत = तुला अंत आहे. दुसरा अर्थ 'स + अंत' म्हणजे तुझ्या शेवटाला स आहे. कारण 'मन:' ह्यात मूळचा शब्द 'मनस्' असा आहे. म्हणून तू 'सांत' आहेस. ह्यासाठी अविनाशी व्हावयाचे असल्यास तू 'अनंता'ची उपासना कर. पण ह्यावर तू असा दावा करशील की माझी मूळ देवता चंद्र आहे. तेव्हा त्याची उपासना सोडून मी अनंताच्या भजनी कसे लागावे ? पण चंद्र क्षयी, आळशी, मंद असल्याने तुला चिरंतन कसा करणार ? शिवाय प्रत्येक अमावस्येला तो नष्टतो. 'सांत'चा दुसरा अर्थ घेतला तरी चंद्राच्या शेवटी 'स' ('चंद्रमस') आहे. तू आणि तो सारखे. मग चंद्र कसा शाश्वताचा लाभ देणार ? चंद्र स्वत:च अनंताच्या म्हणजे आकाशाच्या मार्गाने जातो. अनंताचा दुसरा अर्थ भगवान विष्णू असा आहे. चंद्र स्वत:च जर अनंताच्या मार्गाचे अवलंबन करतो तर मनाने त्याची कास धरून उपयोग कोणता ?

परंतु मन ऐकणार कसे ? मन मानेल तशा सर्वत्र आज्ञा देणारे मन सदैव द्वैतात रमते. अद्वैतात लय पावण्यापेक्षा द्वैताची लय त्याला फार आवडते. मनाचे हे भरकटणे वासनेच्या विशाल पंखांनी विषयांच्या गगनप्रांगणात सुसाटते. ते कोणाही व्यक्तिमत्वाची ताबेदारी पत्करावयास तयार होत नाही. तडजोड हा शब्द त्याला ठाऊक नाही मात्र आपल्या मनाप्रमाणे इतरांनी वागावेसे वाटते. इतकेच नव्हे, मनाच्या हमरस्त्याला अनुयायांचे लक्ष थवे यावेत. यात्रिकांच्या सहभ्रमणातून 'स्व'चा उदोउदो करून आम मनाच्या दगडांवर विचारांच्या छिन्नीचे घाव घालून मंदिरापुढे पायऱ्यांचा खच पडावा. लक्ष ज्योतींनी आपल्या प्रकाशाच्या साह्याने वाटचाल करावी असे मनापासून वाटते. यासाठी ––

रे रे चित्त त्यज द्वैतं त्वमेकत्वं समाश्रय ।
ततश्चासि चिदेव त्वं नात्र कार्या विचारणा ।। १६२.

(सार्थ सुश्लोकलाघव)

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

चित्ता ! द्वैतभाव सोड. अद्वैत भावनेने वाग. तसे केलेस तर तू स्वतःच 'चिदेव' आहेस. चित् + एव = चित्स्वरूप आहेस. कारण 'चित्त' या शब्दातील 'त्त'चा द्विधाभाव सोडल्यास बाकी काय राहाणार ? मनाचे चित्स्वरूप मनातच आहे. द्वैताची काजळी पुसावयास हवी. हे चित्ता ! पित्त उसळल्याप्रमाणे संसारात त्रास होत असताना ईश्वरी कृपेविना कोण तारणार ?

अथ कथय कथं नु मत्तवन्मां भ्रमयसि पित्तामिवेह
वित्तहेतोः ।
रघुपतिपदपद्मचिंतया त्वं भव तूर्णं मम चित्त पूर्ण-
वित्तम् ॥ १६४. (सा. सु.)

हे माझ्या मना ! तू मला धुंद करून वित्ता-करिता पित्त झाल्याप्रमाणे ह्या विश्वात का बरे फिरा-वयास लावतोस ? रघुपतीच्या चरणसेवनाने तू 'पूर्ण-वित्त' होशील. 'पूर्ण–वित्' = परिपूर्ण आत्मज्ञानी होशील. त्यातच सर्व धन आहे. कारण 'पूर्ण'– आणि– 'वित्त' हे शब्द त्यातच आहेत. हे साध्या शब्दरचने-वरून उघड आहे मग तू तसे का बरे करीत नाहीस ? मनाची धाव अखंड आहे. त्याला काळाचे संदर्भ मान्य नाहीत. मनोरा हा शब्द मनाच्या उंचीवरून प्रचारात आला असावा. त्याच्या गरुडझेपेस कुणीही आव्हान देत नाही. मनाचे मूडस् सर्वथैव मनावर अवलंबून असतात. स्वार्थाच्या चक्रामध्ये एकाही आरेस धक्का न देण्याचा तो आटोकाट प्रयत्न करतो. नमुन्यादाखल दिलेल्या या श्लोकातून मनाच्या तळाचे विठोबाअण्णांनी किती मोहक दर्शन घडविले आहे. मनाचे बारकावे श्लेषांच्या माध्य-मातून टिपण्याची कवीची ही किमया त्याच्या चिंतन-शील मनोगताचे द्योतक वाटते. मनाचे स्वगत यातील प्रत्येक श्लोकातून व्यक्त झाले आहे. ईश्वररूपाने शिवतत्त्वाशी घातलेली सांगड डोळस श्रद्धेची साक्ष पटविते. मनाचा हा उपदेश प्रत्येकाने ध्यानी घेण्यापेक्षा वाचता वाचता सहज मनी बिंबतो.

नाचर स्वहितजातकघातकं पातकं तु निरये निपातकम् ।
शंभवे स्पृह्य मानसानिशं शं भवेऽपि भवतो भवेद्-
भृशम् ॥ २१०

हे मना ! आपल्या हिताचा घात करणारी व नरकात पाडणारी पातके तू कधी आचरण करू नकोस. तू जर निरंतर शंभूचीच इच्छा करशील तर (भवेऽपि) संसारात सुद्धा (शं भवेत्) कल्याणच होईल. मानसिक पापांच्या गर्तेत, मना ! चुकूनही जाऊ नकोस. समाज-मन तुझ्या पाठीशी नसले तरी परंपरागत वा गतानु-गतिकतेच्या हिशेबांचा बरावाईट पाढा मनाच्या पिंडशाळेत अवश्य वाच. एखादा तरी यास नक्की दाद देईल. कारण 'काळ अनंत आहे व पृथ्वी विपुल आहे.' तू मात्र योग्यायोग्यतेचा विचार कर. सुसंस्कृत-पणाचा आदर्श तू आचरताना पाहिलास तर इतरांचे "मन" ("नम") अशी "उलट" आज्ञा देईल. साधुसंतांनीही तुला जे काही सांगितले वा तुझ्या कलेने चालले त्याप्रमाणे योग्य ईप्सित साध्य कर. विठोबा-अण्णांचे हे मनाचे श्लोक सर्वज्ञ मनास रामदासांच्या श्लोकांइतकेच कायमचे आव्हान व आवाहन देतात.

रसिक पत्रे.

डॉ. आष्टीकर यांसी,

स. न.

'युगवाणी'चा फेब्रुवारी–मार्चचा जोडअंक मिळाला !

आधीचे दिवाळी अंकादी मिळाले होते ! – आभार !

विदर्भ साहित्य संघातर्फे निघणाऱ्या ह्या मासिकात विदग्ध साहित्य असते हे उचितच आहे ! 'युगवाणी' वाचल्यामुळे नागपुरी वातावरणाचा परिचय होतो. एकूण मासिकाचा दर्जा आगळा आहे. आपल्या युगवाणीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी शुभेच्छा मी व्यक्त करते.

कुमुदिनी रांगणेकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जाणीव

संजय देशपांडे

पहाट झाली ?
नाही.
पहाटेला सुरुवात झाली.
बन्धनातून मुक्ती मिळाली ?
नाही.
सीमा बन्ध, तेव्हडे कळले.
नाते संबंध जुळले, तुटले ?
नाही.
आणखी कुठे तरी नाते आहे,
एव्हडेच कळले.
धरेपासून वर अवकाशात
भ्रमण केले ?
नाही
धरा विश्वातील एक कण आहे.
येव्हडेच कळले.

बंदिस्त

सुभाष ज. गढीकर

बंदिस्त होऊन पडलेल्या
याही चौकातलं वास्तव्य
आता संपलेलं.
इथून फुटणारी वाट
कुठे जाणाराय्–
माहीत नाही.
पुढे लागेलही एखादा
गुलाब ताटवे फुललेला,
मुक्त वातावरणानं भारलेला
चौक.
कदाचित भेटेल
एखादं उजाड वाळवंटही !
मागे वळून न पाहता
आपण आपलं चालतच राहयचं.
बस.

मी वेडा महंमद

वनिताप्रसाद

मी वेडा महंमद
आकाशातील ढगांना
साचेबंद रूप देण्याच्या प्रयत्नात
धावतो आहे, पळतो आहे
पडतो आहे
थांबणार नाही !
ढग पळताहेत
भिरभिरताहेत
साचे बदलताहेत
पळता पळता ढग मला वेडावताहेत
मी वेडा महंमद
ढगांमागे धावतो आहे !

बंधन

स्वाती शहाणे

बोलावयाचे आहे खूप
    पण काढून घेतले आहेत शब्द
सांगावयाच आहे खूप
    ऐकू शकत नाही कोणी
करावंसं वाटतंय खूप
    पण हात माझे जखडले आहेत
धावावंसं वाटतंय खूप
    पण पाय माझे बांधले आहेत
बंधनांची ह्या जाणीव होता
    नेत्री दाटतात अश्रू
वाहू देते त्यांना मी मुक्तपणे
    ते तरी अद्याप बंधमुक्त आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुषार

बबन सराडकर

किती दिसांची अवस
खेळ अंगणी मांडिते,
किती किती दिवसांचे
डोळे चांदणे शोधिते !
वाट कापता कापता
झाली उन्हाळी दुपार
देह भिजवू पाहते
आता दुःखाचे तुषार

पान

ज. सा. गवळीकर

भरकटलेल्या पानांची दशा
तीच वावटळीची नशा
या नशेच्या जल्लोषात
पाने मात्र गांगरतात
मी एक भरकटलेले पान
मला न पाहिजे कसला मान
वावटळीच्या जल्लोषात
मी मात्र 'मरतो' गात

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि त्यांचा इतिहास
मराठीचे अध्ययन आणि अध्यापन
शिल्प, संगीत, चित्र आणि नाट्य आदी ललितकला
यांविषयी मूलग्राही आणि व्यापक दृष्टिकोण स्वीकारुन

'**युगवाणी**' यथाशक्ती वाटचाल करीत आहे.
ह्या तपश्चर्येच्या सफलतेसाठी आपल्या लोभाची, आस्थेची
आणि सहकार्याची नितान्त गरज आहे.

वर्गणीदार आणि वाचक होऊन
जाहिराती देऊन, मिळवून देऊन
'युगवाणी'त निष्ठेने लेखन करून
रेखाटणे आणि कलात्मक छायाचित्रे देऊन
आपण सहयोग करू शकता.

'**युगवाणी**' आपल्या चिंतनाचा विषय होऊ शकते.
जिथे आस्थेने मराठी वाचली जाते तिथे '**युगवाणी**'ची
चर्चा करू शकता.
स्नेह्यांना आणि नातलगांना '**युगवाणी**' विषयी सांगू शकता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नवे नवनीत

म. रा. जोशी

एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात रसिकवर्य परशुरामतात्या गोडबोल्यांनी प्राचीन मराठी काव्यातील उत्तमोत्तम वेचे 'नवनीत' रूपाने प्रसिद्ध केले. ह्या संग्रहात ज्ञानेश्वरापासून मोरोपंत व रामजोशी यांच्या पर्यंतच्या कालखंडातील कवींचे वेचे असले तरी परशुरामतात्यांच्या वेळी जे प्राचीन कवी ज्ञात होते त्यांचीच काव्यसंपदा मराठी वाचकांसमोर आली. पण परशुरामतात्यांनंतर संशोधकांच्या अविरत प्रयत्नांमुळे असंख्य नवीन कवी उजेडात आले. तसेच परशुरामतात्यांनंतर केशवसुतांनी 'तुतारी' फुंकून ज्या नवीन प्रबोधनास आरंभ केला त्यामुळे नवीन पिढीतील कवींच्या काव्याने घेतलेले वळणही रसिकांच्या समोर येणे अत्यावश्यक होते. याच उद्देशाने मुंबईच्या ज. शा. देशपांड्यांनी 'नवे नवनीत' नावाचा उत्कृष्ट प्रातिनिधिक काव्यसंग्रह एकोणवीसशे एकोणसाठ साली प्रसिद्ध केला. ह्या उपक्रमाचे सर्वांनीच स्वागत केले व लवकरच पहिल्या आवृत्तीच्या सर्व प्रती संपून गेल्यामुळे 'तिची मूळ चौकट' न बदलता नवीन व प्राचीन कवींच्या काव्याचे सम्यक दर्शन घडविणारे वेचे संकलित करून संदर्भासह कविपरिचय दिलेला आढळतो. संपादकांनी काव्यवेच्यांचा नीट आस्वाद व कविकालाचा योग्य तो परिचय वाचकांस व्हावा म्हणून काव्यसंग्रहाचे तीन खंड तयार केले. पहिल्या खंडात सोमेश्वर चालुक्यापासून पाद्री एतिएन दलाक्रुवा पर्यंतचे म्हणजे इ. स. ११३० — १६२९ दरम्यानचे ऱ्याहत्तर कवी, दुसऱ्या खंडात मुक्तेश्वरापासून परशुरामापर्यंतचे म्हणजे इ. स. १५९९—१८४४ दरम्यानचे पन्नास कवी व तिसऱ्या खंडात परशुरामतात्यांपासून गुमास्तेपर्यंतचे आधुनिक कालातील सहासष्ट कवी जे आढळतात त्यावरून गोडबोल्यांच्या 'नवनीता'पेक्षा देशपांड्यांच्या 'नवे नवनीता'चे सापेक्ष स्वरूप चटकन डोळ्यांत भरते. ह्या काव्यसंग्रहाला शेवटी जोडलेल्या शब्दसूची व कवीसूचीमुळे संपादनाला सर्वांग परिपूर्णता जशी आली तशीच कवी परिचयामुळे मराठी कवी व वाङ्मयाचा इतिहासच लिहिला गेला. गेल्या कित्येक वर्षांपासून संशोधकांच्या प्रयत्नामुळे जी नवीन माहिती सापेक्ष अभ्यासूंच्या समोर आली तिचा भरपूर उपयोग संपादकांनी तर केलाच, पण त्याचबरोबर स्वतःही संशोधन केले. किंबहुना "गेल्या चौदा वर्षांत इतकी नवीन माहिती उपलब्ध झाली की तो नवीन लिहावा लागला व ऐंशी एक पाने लिहिणे हा एक संशोधनग्रंथ लिहिण्यासारखा खटाटोप झाला." ह्या संपादकांच्या विधानाचा प्रत्यय वाचकाला पानोपानी आढळतो ह्यात मुळीच संशय नाही.

मुद्रणाच्या सोयीमुळे गेल्या कित्येक वर्षांत नवीन व प्राचीन कवींचे काव्यसग्रह उपलब्ध होत असताना व दररोज 'युगप्रवर्तक' काव्यांची भर पडत असताना, नवनीतासारख्या काव्यग्रंथाची आवश्यकता काय, असा प्रश्न आजचे अनेक समीक्षक विचारताना दिसतात. पण आजच्या कवितेने सर्वच रसिकांची वाङ्मयीन भूक भागतेच असे नाही. उलट असभ्य ग्राम्यतेने व अर्थशून्य दुर्बोधतेने उबगच येतो! आजचा बराचसा वाचकवर्ग वर्तमानपत्री समालोचन समीक्षेवर अवलंबून राहून आपापली वाङ्मयीन मते तयार करतो. पण केवळ समीक्षा वाचून मूळ काव्याची ओळख होत नसते. ह्यासाठी कवीच्या मूळ संहितेचेच वाचन केले पाहिजे. पण आजच्या जीवघेण्या धावपळीत सामान्य वाचकाला क्षणाचीही उसंत नसल्यामुळे मूळ काव्यसंहिता पाहण्यास त्याला पुरेसा वेळ व मनःस्वास्थ्य नसते. अशा पेच प्रसंगातून उत्तम मार्ग ज. शा. देशपांड्यांनी काढला. नदी जशी प्रवाहरूपाने सागरात जाते तसाच कविता वेच्यांनी वाङ्मय सागराकडे जाण्याचा मार्ग संपादकांनी दाखवून दिला. विदग्ध अभिरुचिनिर्मितीप्रमाणेच काव्येतिहासाचेंही सम्यक् दर्शन 'नवे नवनीत'सारख्या काव्यसंग्रहाने होते. एकेका कवीच्या काव्यकृतीचा आस्वाद घेताना वाचकाच्या समोर आपोआप गेल्या आठशे वर्षांतील मराठी कवितेने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

घेतलेली वळणे उभी राहतात. काव्यास्वादाबरोबर वाचकाला कळून चुकते की, हे कवी मोठे सहृदय व निसर्गप्रेमी असून मानवाच्या भावविश्वाचा ठाव घेतात. प्रसन्नमधुर काव्य निर्माण करणाऱ्या ह्या कवींचे मन आणि वाणी शुद्ध व सत्यनिष्ठ असून त्यांचे सृष्टीतल्या चराचरावर प्रेम आहे. शब्दकुसुमांनी सरस्वतीचरणी काव्यपुष्पे अर्पण करणाऱ्या कवींना मानवाच्या सुख-दु:खाची जाणीव असल्यामुळे, त्रिकालाबाधित उत्स्फूर्त वचने त्यांच्या काव्यात सर्वत्र दिसतात. कृत्रिम बंधने झुगारून आत्मतत्त्वाचा गंभीर विचारही अनेकांच्या रचनेत आढळतो. मानवी जीवनातील दिव्यभावाने ज्ञानेश्वर–तुकारामादिकांचे काव्य तेजाळले आहे. उदात्त व निर्मल देशप्रेमानेही प्रेरित होऊन काहींनी काव्य रचना केलेली आहे. आपल्या सर्वस्वाचा होम करून स्वातंत्र्यसूक्त गाणाऱ्या कवींच्या काव्याची उपेक्षा व 'विश्वचि माझे घर' म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांनाच, जेव्हा पुरोगामित्वाची झूल अंगावर घेणारे आजचे जातीय-वादी हिणवतात तेव्हा परतत्त्वदर्शी ज्ञानेश–परंपरेची यथार्थ ओळख करून देण्यासाठी 'मुदतपूर्व सेवानिवृत्ती' स्वेच्छेने स्वीकारून, देशपांड्यांनी 'नवे नवनीता'च्या कार्यास प्रारंभ केला. अशासारखे काव्यग्रंथ विद्या-पीठाच्या (बी. ए.) वाङ्मय–स्नातक सारख्या परीक्षेला नेमल्यास मराठी काव्येतिहासाची जाणीव व काव्यक्षेत्रातील विविध काव्यपरंपराची यथार्थ ओळख विद्यार्थ्यांना होईल.

[नवे नवनीत, संपादक – ज. शा. देशपांडे, आ. दुसरी, मुंबई १९७३. मूल्य रु. १२=५०]

विदर्भ साहित्य संघ प्रकाशन

" युगवाणी "

कला, साहित्य व समीक्षा ह्यांना वाहिलेले मराठी मासिक

वर्ष ३३ वे

पत्ता – झांशी राणी चौक, नागपूर ४४० ०१२

जाहिरातींचे दर (दिवाळी अंक सोडून)

पूर्ण पृष्ठ –	१५० रु.
दोन तृतीयांश पृष्ठ –	१२५ रु.
अर्ध पृष्ठ –	१०० रु.
मल पृष्ठ – ४	३०० रु.
मल पृष्ठ – ३	२५० रु.

आकार – २४½ सें. मी. × १८½ सें. मी.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वामन इंगळे यांची कविता

जयंतकुमार बंड

आजची मराठी कविता एका विषण्ण मनाचे चित्र आहे. कमकुवत मनामुळे निराशाच पदरी पडत असते. साऱ्या जगाने आपणाला वाळीत टाकलेले आहे; आपल्या जीवनाचा साज निरर्थक आहे; हे जीवन जगायचं तरी कशाला ? हा सर्व खटाटोप कशासाठी ? काय अर्थ आहे या साऱ्याचा ? असा निराशावादी सूर आजच्या काव्यात इतस्ततः पसरलेला दिसतो. सारे कवी माणुसकीला पारखे झालेले दिसतात. एकाकी दिसतात. भोवतालच्या परिस्थितीचा त्यांच्या मनावर विपरित परिणाम झालेला जाणवतो. या परिस्थितीवर मात करण्याची शक्ती त्यांचेजवळ नाही. कमकुवत मनात नाना प्रकारचे संभ्रम निर्माण झालेले असल्यामुळे ते न्यूनगंडाच्या आहारी गेलेले आहेत. शिव्यांची लाखोली वाहिल्याशिवाय दुसरं ते काहीही करू शकत नाहीत. शिव्या देणे हे जणू काही आजच्या कवींचे ब्रीद आहे.

भोवतालच्या वातावरणाचा कवीच्या अंतः-करणावर परिणाम होत असतो. नव्हे, तो तसा होणे अपरिहार्य आहे. या वातावरणात कवीला जे जाणवतं, भासतं त्यामुळे त्याचं सहृदय अंतःकरण हेलावतं. याचा परिणाम त्याच्या काव्याच्या अभिव्यक्तीवर होत असतो. अभिजात कवी सामाजिक परिस्थितीचा सुदृढ मनाने यथासांग अभ्यास करून आपल्या काव्यात त्या परिस्थितीचे रंग बेमालूमपणे मिसळत असतो. सामाजिक अगतिकता त्याच्या काव्यात दिसत नाही. परिस्थितीसमोर हतबल होणारी वृत्ती ही नेहमी टीकेला पात्र ठरेल, यात तिळमात्र शंका नाही. वामन इंगळे हे विषण्ण मनःस्थितीचं चित्र रेखाटणाऱ्या कवींच्या जवळपासही फिरकत नाहीत. त्यांनी समाज-स्थितीचा यथासांग अभ्यास करून समाजात राहणाऱ्या सामान्य माणसाचं चित्र—त्याच्या भावभावना, सुखदुःखं, हितसंबंध, आचारविचार, गुणवैशिष्ट्यं यासह रेखाटलेलं आहे. हे चित्र इतकं प्रभावी, संपन्न आणि जिवंत आहे की ते एखाद्या जिवंत व्यक्तीचंच चित्रण वाटावं. येथे सामान्य माणसाच्या जाणिवा काव्यरूप धारण करून अभिव्यक्त होतात. सामाजिक जाणिवा उदात्त स्वरूपात प्रगट करीत वास्तवाला प्रखर करणे हेच इंगळ्यांच्या काव्याचे वैशिष्टच आहे. इंगळ्यांना जे सांगावयाचे, मांडावयाचे आहे ते हे. अर्थहीन काव्य-रचनेचा त्यांना हव्यास नाही. त्यांच्या काव्यदृष्टीचे मर्म काहीतरी सांगण्यात आहे. पण त्यासाठी कृत्रिमता स्वीकारण्याची त्यांची तयारी नाही.

> शब्दांचे जेव्हां जमते सूत
> यमकांना होते घाई
> अशा क्षणाला माझ्याजवळी
> सांगायचें नसतें कांही

म्हणूनच ते सामाजिक वास्तवाला प्रखर करण्यासाठी निरनिराळे प्रयोग करताना आढळतात. कधी फॅंटसी; हरदासी पद्धतीचे नाटचमय निवेदन तर कधी रूपक-कथेला जवळ असणारा फॉर्म इत्यादी प्रकार ते यशस्वी-रित्या हाताळतात. ' आगाऊ अभंग ' हे तर त्यांच्या काव्याचं खास वैशिष्टच. त्यांना आध्यात्मिकतेचा स्पर्शसुद्धा जाणवत नाही. उलट त्या माध्यमातून स्वार्थांध वृत्ती, सामाजिक विषमता, अन्याय, अत्याचार, सामाजिक सोंगढोंग या सर्वांचे स्वरूप उघड केले आहे.

स्वतंत्र भारतात भांडवलशाहीचा विकास होत गेला. लोकशाहीच्या हातात हात घालून भांडवलशाही मार्गक्रमण करीत आहे. लोकशाहीने तिला आधार देऊन तिचे पोषण केले आहे. देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी भांडवलशाहीने कदाचित हातभार लाव-लाही असेल, औद्योगिक प्रगतीच्या अनुषंगाने राष्ट्राची भौतिक प्रगतीही होत असेल, राष्ट्राचा विकास होऊन ते भरभराटतही असेल; पण या भांडवलशाहीचे सामान्य जनमानसाच्या जीवनावर विपरीत परिणाम झालेत. सामान्य माणूस हा या बदलत्या प्रवाहाला आत्मसात तर करू शकला नाही, उलट तो त्यामुळे हादरून गेला. बदलत्या परिस्थितीला तो यशस्वीरित्या तोंड देऊ न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शकल्यामुळे तो नागवला गेला. हाच सामान्य माणूस इंगळयांचे लक्ष्य आहे.

सामान्य माणसात असामान्य शक्ती असते. तोच क्रांतीला जन्म देऊ शकतो. समाजात त्याला हवा असणारा आमूलाग्र बदल तो करू शकतो. पण जीवनातील हजार भानगडींपायी त्याचे सारे आयुष्य उद्ध्वस्त झालेले असते. तो विवंचनेच्या सागरात गटांगळ्या खात असतो. यातही भाकरीची विवंचना त्याला सारखी भेडसावत असते. भाकरीसाठी लढा देण्यासाठी त्याने आघाडी उघडलेली असते. त्याचे लक्ष्य भाकरी या नावाचे एक पूर्ण गोल सत्य हे असते. तो त्याची निरगाठ सोडविण्याचा प्रयत्न करतो. कारण भाकरीचा प्रश्न सुटला तर सारेच प्रश्न सुटणारे असतात. याच प्रश्नाचा गळफास त्याने मानेभोवती आवळलेला असतो. या प्रश्नाव्यतिरिक्त त्याच्या खाजगी आयुष्याला अर्थ नसतो. खाजगी आयुष्यात तो कितीही चारित्र्यवान, तत्त्वज्ञ असला तरी त्याला यासाठी असत्याला वळी जावे लागते.

[पण तेवढी भाकरी हा त्याचा वुईक पॉइंट]
तिच्यासाठी लढला–लढतो, लढणार आहे–तो युद्धे

या युद्धाच्या आघाडीवर तो क्षणोक्षणी जखमी होतो. आणि युद्धकैदी होतो. त्याच्या तोंडाची आणि भाकरीची भेटच होत नाही.

भाकरही येथे तोंडास ना तोट
दोहोंची भेटच होत नाही.

'जे सर्वांना मिळतं तेच मला मिळावं', या मागणीशिवाय तो जास्त काही मागत नसतो. त्याला सुख नाही मिळालं तरी चालेल. पण त्याची भूक शमली पाहिजे. त्याची भूक त्याला प्यारी असते.

असो नसो खात्री – शाश्वत सुखाची
हवीच शाश्वती – भाकरीची
प्रार्थना देवोत – 'तसे' उंच सुख
मला माझी भूक – गोड लागे

स्वराज्यात भाकरीला पारखा झालेल्या या माणसाला स्वराज्यापूर्वी महाराणीची इमानी चाकरी केली तर भाकरी मिळत होती.

स्वराज्याच्या पूर्वी
इमानी चाकरी
देई गे भाकरी
महाराणी

भाकरीची चिंता अहोरात्र भार वाहणारा हा माणूस आपली प्रतिष्ठा सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो. प्रतिष्ठेच्या तकलादू कल्पनांना बळी जाऊन तो समाजातील भ्रष्टाचाराचा प्रतिकार करीत नाही. म्हणून भ्रष्टाचाराची आग सारखी फोफावत जात समाजाला पोखरीत जाते. समाजातील स्वार्थी माणसांचा गट भ्रष्टाचाराचा प्रणेता असतो. सामान्य माणूस स्वतःच्या बेइज्जतीला भीत असल्यामुळे या स्वार्थी माणसांना विरोध करीत नाही. या स्वार्थी जगात जीवन जगणं त्याला कठीण होऊन बसतं. त्याची हीनदीन अवस्था होते. स्वार्थी, संधिसाधू तर त्याला लुटण्यासाठीच सरसावलेले असतात. त्याच्या साधेभोळेपणाचा ते आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेतात. आणि मग साहजिकच प्रश्न उपस्थित होतो की,

'असे मनुष्यदेह सुलभ कधीपासून झालेत ?'

स्वत: नागवला गेलेला हा माणूस इतरांची असहायता पाहून कळवळतो आणि त्यांच्यासाठी प्रार्थनेशिवाय तो काहीही करू शकत नाही.

'दे गा देवा शक्ति यांना थंडी सहावया ?'

माणसाची अशी हीनदीन अवस्था होण्याला कारणीभूत माणूसच आहे. सारेच विकारांनी लिप्त असतात. त्यांचे मनोविकार प्रबळ झाले की त्यांच्या आहारी जाऊन आपल्या स्वार्थासाठी माणूसच माणसाला शूद्रत्वाप्रत नेतो.

दगडाचा देव
माणसाचा भंगी
विधी माणूसच
माणसाला

माणूस थोडा उंचावला की तो इतरांना तिरस्करणीय, तुच्छ समजतो. त्यांच्याकडे कुचेष्टेने पाहतो. हलकट मनोवृतीच्या आधीन होऊन माणसाचं साधेपण नष्ट करतो. मनुष्यत्व मातीमोल ठरवितो. अशाही परिस्थितीत सामान्य माणूस आपले जगणे जगत असतो. त्याला कुणाचीही साथ नसली तरी तो आपले जीवन संघर्ष करीत जगतो. त्याला जगण्याचा अधिकार असतो. जगण्यासाठी पिळदणुकीला त्रासून केविलवाणी धडपड करीत आर्त स्वराने म्हणतो,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जगा जगू द्या रे जगण्याच्या झुंजी
साऱ्या किलवंडी खालीपीली.

इतरांबरोवर आपल्यालाही सुखासमाधानाने जगता यावे, अशी त्याची स्वाभाविकच मनीषा असते. पण परिस्थितीशी झगडता झगडता तो मेटाकुटीस आलेला असतो. दु:खाशिवाय त्याच्या पदरी काही पडत नाही. दु:खाच्या डोंगराखाली तो दबलेला असला तरी सुखाची आशा त्याने सोडलेली नसते. सुखाचे कृपाछत्र आपल्या डोक्यावर असावे, अशी त्याची स्वाभाविक इच्छा असते.

जिथे तिथे ऐकू येते
झुंज आणि कुंथ
तिथे तिथे स्वर हे लागो
भाबडे नि:शंक
दु:ख डोंगराच्या चणीचे
असो पायथ्यास
सूर्य असो डोक्यावरती
शेष सर्व ठीक

सुखाच्या आभासात जगणाऱ्या या माणसाला कशाचीही अपेक्षा नाही. सुखालाही तत्त्वत: काही अर्थ नसतो. सुख हे पावसाळ्याप्रमाणे, अपूर्ण आहे, याची त्याला जाणीव असते. त्याची सर्वांनी सुखी व्हावे ही प्रार्थना व्यर्थ गेल्यामुळे खोटया समाधानातच जगणे त्याला आवडत असते. त्याला आपल्या आयुष्याचा मार्ग दु:ख पचवूनच आक्रमावा लागत असल्यामुळे तो दुसऱ्यांचे दु:ख पाहून कळवळतो. यातच आपल्या उणीवांची पूर्ती करण्याचा प्रयत्न करतो,

तुझ्या वेदनेच्या — एकाच स्पर्शाने
उणीवांचे माझ्या — धन होते

याच त्याच्या वृतीमुळे, तो वर्दळीत वावरताना एकाकी पडला तरी त्याच्या मनाला आप्तांची चिंता ग्रासीत असते. परंतु एकाकीपणामुळे तो सर्वांपासून दूर दूर जात असतो. या पळवाटेची भीती त्याला वाटते. त्याची अशी द्विधा मन:स्थिती झालेली असते. खरोखर हा मनुष्य खोटयाच्या आभासात जिवंतमरण जगत असतो म्हणून जीवनसंघर्षात अपयशी ठरतो.

हृदये असून यांना नव्हती कधीच छाती
ते ना कधीच होते दर्यामधून गेले.

तो एकटा पडतो कारण सामजिक क्रांतिकुंडात तो उडी घेत नाही. बदलण्याची त्याची वृत्ती नसते. वास्तविक तोच समाजपरिवर्तन करण्यास समर्थ आहे. पण त्याच्या या अप्रागतिक वृत्तीमुळे समाजाचा फायदा तर होत नाही पण त्याचाही नाही. त्याचेसाठी त्याचेशिवाय काहीही उरत नाही. त्याला उद्याची आशा असते. आपापत: सर्व काही घडणं अशक्य आहे. उद्याची सुखसमृद्धी आजच्या कामाची, उपयोगाची नाही; याची त्याला जाणीव असूनही भविष्याबद्दल जबरदस्त आकांक्षा त्याचे मनात असते.

शांततायन येईल अशा आशेवर ढकलीत आहे तो
आजची इच्छा मारणे उद्यावर

अशा प्रकारे हा सामान्य मनुष्य दिशाहीन आयुष्य जगत असतो. त्याला होणारं मार्गदर्शनही चुकीचं असतं. म्हणून त्याच्या आयुष्याला योग्य वळण लागत नाही. एका चाकोरीत तो जखडल्या जातो. त्या चाकोरीबाहेर न पडता तीत तो आपल्या सोयीनुसार बदल करीत असतो. चुकीच्या मार्गदर्शनामुळे त्याची वाट चुकली तरी योग्य वाट शोधण्यासाठी त्याला वाटेनेच गेले पाहिजे तेव्हाचं योग्य ती वाट त्याला गवसण्याची शक्यता असते. पण निष्क्रियतेमुळे तो या फंदात पडत नाही. सभोवतालचं वातावरण कसंही असलं तरी सारं काही व्यवस्थित होईल अशी त्याला आशा असते अन् तशी त्याची इच्छाही असते. पण वातावरणाला मनासारखी कलाटणी देण्यासाठी तो कधीही पुढे सरसावत नाही. या त्याच्या निष्क्रियतेमुळे मृत्यूनंतर त्याचे अस्तित्व संपुष्टात येत असते.

सामाजिक विषमता हा भारतीय समाजाला मिळालेला शाप आहे. हा प्रश्न अजूनही संपुष्टात आला नाही. वास्तविक जन्माने प्रत्येक मनुष्य हा सारखा असतो. परिस्थितीमुळे माणसामाणसात नाना प्रकारचे भेद निर्माण होऊन ते पराकोटीला गेलेले आहेत. जन्माला महत्व प्राप्त झालं आहे. परिस्थिती माणसाला घडवीत असते. आता परिस्थिती अशी आहे की जन्माने कोणत्याही जातीत जन्मलेल्या माणसाला कोणतीही कामं करावी लागतात. त्यामुळे जन्माचं महत्व कमी झालं आहे. माणसाने केलेल्या विभागणीला कोणताही अर्थ उरलेला नाही तरी माणसाच्या मनातून या विभागणीचं खुळ नष्ट झालेलं नाही.

ब्रह्मपुत्रा नेते – सर्वांचेच पीक
नेणते फरक – कोणताही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देतानाही ती गा – सारखीच न्यायी
नेणते गा आई – नेतेपण

निसर्गही माणसामाणसात फरक करीत नाही. तेव्हा माणसानं निर्माण केलेले कृत्रिम भेद नष्ट झाले पाहिजे. म्हणजे साऱ्यांच्या आशाआकांक्षांना मूर्त रूप येऊ शकेल.

माणूस मूलत: नि तत्त्वत: स्वतंत्र आहे. माणसाचं स्वातंत्र्य घटनेनंही मान्य केलं आहे. पण त्याला त्या स्वातंत्र्याचा अबाधितपणे उपभोग घेता येत नाही. प्रत्येकाला स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा म्हणून सामाजिक विषमता नष्ट होण्याची निकड आहे. प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या प्रवृत्तीनुसार जीवनाचे प्रश्न सोडविण्याचे, जीवनाच्या गूढ तत्त्वांचा शोध घेण्याचे स्वातंत्र्य हवे. म्हणजे तो आपले जीवनविषयक प्रश्न सोडवून आपल्या गरजा पूर्ण करू शकेल व सुखासमाधानाने जीवन जगू शकेल.

दलितांचा प्रश्न अजूनही प्रत्येक पातळीवर सुटलेला नाही. दलितांवर अजूनही अन्याय होत आहे. सुधारणेच्या गोष्टी तो ऐकतो पण त्यांचं दर्शन त्याला होत नाही. त्याला मिळणाऱ्या सवलतींवर दलितेतर जळत असतो. त्याच्या जळण्यात काही अर्थ नाही कारण दलितांचा प्रश्न जुना झाला असला तरी सुटलेला नाही.

मित्रा प्रश्न जुने होतात पण जुनं होणं म्हणजे
सुटणं नव्हे.

सामान्य माणसाप्रमाणेच स्वार्थी माणसाचे इंगळ्यांनी रंगविलेले चित्र लक्षणीय आहे. स्वार्थी माणूस फक्त आपलेच सुख पहात असतो. त्यासाठी अन्याय–अत्याचाररूपी साधनांचा तो अवलंब करीत असतो. तो तिकीटाचा (निवडणुकीचं) भोक्ता असतो. त्याचे तिकीट धोक्यात आले की तो पिसाळतो. तिकीटाच्या चिंतेचा तो भार वहातो. इतरांचं त्याला काही करावयाचं नसतं. तद्वतच तो बदलत्या परिस्थितीची सुद्धा तमा बाळगीत नाही.

कुणी जळो मरो
उरो हे तिकीट

विदर्भ असला काय किंवा महाराष्ट्र असला काय? यासंबंधी त्याला कर्तव्य नसून त्याच्या दृष्टीने तिकीट महत्वाचे असते. हा मनुष्य बाह्य स्वरूपावरून ओळखता यावयाचा नाही. अनेक मुखवटे धारण करून त्या आड आपलं खरं स्वरूप यानं लपविलेलं असतं. स्वत:च्या स्वार्थासाठी हा वाट्टेल ते करतो – अन्याय, अत्याचार, जुलूम. स्वत:ची सामाजिक प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी तो देणग्या वगैरे देतो (हा एक मुखवटाच). म्हणून तो दानशूर होत नाही. यावरून त्याचा नि:स्वार्थीपणा सिद्ध तर होतच नाही उलट नवीन अत्याचारांसाठी त्याला मार्ग मोकळा असतो. आत्मतुष्टीकरिता इतरांच्या वस्तूंचा उपभोग घेऊन तो नामानिराळा राहातो.

रक्त न ये ऐशी
मारावी गा सुरी
हिंसेलाही घरी नसो थारा.

असा तो अस्सल वनिया असतो. त्याच्या दुकानात काळेबेरे धंदे चालतात. दुसरं काहीही नाही. त्यातच तो खितपत पडलेला असतो. खोटं उत्कटत्वाने नि बेफामपणे खरं करून दाखविण्यात तो तरबेज असतो. स्वत:च्या स्वार्थासाठी तो श्रमजीवींवर वाटेल ते अन्याय, अत्याचार करतो. वास्तविक तो त्यांच्याच जिवावर चैन करतो. सारी सुखोपभोगाची साधनं पुरविणाऱ्या श्रमवंतांच्या पाठीवरील वळ त्याच्यावरील जुलुमाची साक्ष देतात. हा श्रमवंत खवळला तर समाजात आमूलाग्र बदल केल्याशिवाय राहणार नाही.

उठतील हात जेव्हा श्रमवंत झडझडून
हे आजचे उद्याला मग राहणार नाही.

म्हणून या स्वार्थी भांडवलदाराने श्रमवंताचे महत्त्व मान्य करून सर्व सुखोपभोग स्वत: लुटण्याची वृत्ती सोडणं हे त्याच्या हिताचं ठरेल.

सामजिक वास्तवाला प्रखर करण्याच्या हव्यासापायी इंगळ्यांच्या फक्त एका कवितेत (कॅब्रे) अश्लीलता आलेली आहे. त्यामुळे वास्तवाचं स्वरूप जरी स्पष्ट होत असलं तरी अश्लीलतेचं समर्थन करता येणार नाही. परंतु जमेची एक बाजू आहे. कवितेचा शेवट करतांना त्या वेडीच्या जागी कवीला आपली आई आठवते नि संपूर्ण कवितेतील आशय उदात्त स्वरूप धारण करून प्रकट होतो.

इंगळ्यांची जाणीव मुख्यत: सामाजिक आहे. नव्हे, त्यांच्या कवितेचा तो सहजधर्म आहे. म्हणूनच सामाजिक आशय स्पष्ट करीत करीत इंगळ्यांची कविता समाजकारणाचा नि राजकारणाचा वेध घेते.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कधी कधी प्रतिमांच्या हव्यासापायी सामाजिक आशय लोपल्यासारखा वाटतो. समाजाकडे पहाण्याची त्यांची सकस दृष्टी जाणवते. ते सामाजिक सोंगढोंग, अन्याय, अत्याचार यांचं चित्रण करतात पण त्याला विखाराचा स्पर्श सुद्धा होत नाही. संतापानं, चीड येऊन त्यांनी घटनांचं निवेदन केलेलं नाही. नामदेव ढसाळांची कटुता त्यात नाही. इंगळ्यांची जाणीव प्रगल्भ असल्यामुळे ती संतापावर, कटुतेवर मात करीत असावी.

इंगळयांच्या कवितेचा विकास सौंदर्यवादाकडून वास्तववादाकडे असा झालेला आहे. त्यांच्या सामाजिक जाणिवेने त्यांच्या सौंदर्यवादी दृष्टीवर मात केली आहे. आणि तीच जाणीव कविता वाचतांना सतत जाणवत रहाते.

इंगळयांच्या सर्व जाणिवांच्या मुळाशी असलेली जीवनदृष्टी निरीश्वरवादी आहे. इंगळयांचा सामान्य माणूस ईश्वराजवळ प्रार्थना करतांना आपल्याला दिसतो पण त्याची मातब्बरी त्यांना वाटत नाही. माणसाच्या व्यवहारात ईश्वराला कोणतेच स्थान नाही. त्याच्या अगतिकतेला, असहायतेला, हीनदीन अवस्थेला माणूसच कारणीभूत आहे. तोच आपली प्रगती करू शकतो. या संदर्भात ईश्वराचे अस्तित्व मान्य करावयास ते तयार नाहीत. आगाऊ अभंगांना आध्यात्मिकतेचा स्पर्श सुद्धा झालेला नाही. त्यांची सामाजिकता त्या अभंगांतून उग्र स्वरूप धारण करीत असलेली दिसते.

विज्ञानाच्या सिद्धांतांच्या आधारे परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध झाल्याशिवाय त्याचेवर विश्वास ठेवायला इंगळे तयार नाहीत. त्याला ते काल्पनिकच मानतात. त्यामुळे त्याच्यासमोर असणाऱ्या मागण्या, याचना, प्रार्थना या सुद्धा काल्पनिकच असतात. ईश्वराचे अस्तित्व जोपर्यंत सिद्ध होत नाही तोपर्यंत तर्काचे गोटे भिरकावता येतात. श्रद्धेचे अचूक लागतात (अंधश्रद्धा). त्याचे अस्तित्व जर सिद्ध झालेच तर त्याचे ते 'आगाऊ आभार' ही मानतात. देवळाच्या गाभाऱ्यातील देवाची कवीला ओढ नाही. त्यापेक्षा देवळाच्या पाठीवरील संभोगशिल्पांमध्ये त्याला विशेष रस वाटतो. जिथे जिथे देव तिथे तिथे कामवासना प्रदीप्त करणारी संभोगशिल्पे ! ही विसंगती मनाला बोचते. जर अशा परमेश्वराच्या माहात्म्याने इंद्रायणीकाठी ग्रंथ कोरडा राहातो तर सत्यासाठी आरडाओरडा का चालावा ? या परमेश्वराची थोरवी तर याहूनही महान दिसते. वाळवंटात याने प्राणिमात्र निर्माण केले पण त्यांच्या तहानेची व्यवस्था करून ठेवली नाही. त्यांनी भीक मागितली तरीही मिळत नाही. उलट उंटाच्या पोटातील पाणी प्यावयाचे असेल तर त्याचा सदोष वध करावा लागतो. ही ईश्वरी किमया अजब असून मती गुंग करणारी आहे.

परमेश्वरी अस्तित्वावर रान उठविणारे इंगळे परमेश्वराला अंधत्व जाण्यासाठी डोळ्यांची मागणी न करता अश्रूंची मागणी करतात. इथे संतांची आठवण होणे अपरिहार्य आहे. हा सृष्टीचा पसारा कुठून आला आहे ? परमेश्वराची कृपादृष्टी जर सर्वत्र असेल तर समाजात भेदाभेद कुठून आलेत ? मी कुठून आलो ? माझे नास्तिक्य आणि त्याचे आस्तिक्य कुठून आले ? इत्यादी जे प्रश्न ते 'कुठून ?' या कवितेत उपस्थित करतात, त्यांना परमेश्वराशिवाय योग्य उत्तर नाही. स्वतःचे नास्तिकत्व उघडपणे मान्य करणारे इंगळे हेच का ? हा प्रश्न उपस्थित होतो.

वामन इंगळे यांची कविता अशी निरनिराळया प्रांतांबद्दल बोलत असली तरी ती मुख्यतः सामाजिक आहे. सामाजिकतेच्या अवगुंठनाखाली साऱ्या भावना लपलेल्या आहेत. सामाजिकता इंगळयांच्या काव्याचा सहजधर्म आहे. त्याशिवाय त्यांच्या काव्याला पूर्णत्व नाही. ते अगदी सहजतेने मानवी मनोवृत्तींचं चौकस निरीक्षण करून त्या प्रवृत्तींचं दर्शन घडवितात. त्यांनी आपल्या आवाक्यानुसार गूढ जीवनतत्त्वांचा शोध घेतलेला आहे. हा आवाका मात्र समर्थ आहे म्हणूनच त्यांनी अनिष्ट समाजप्रवृत्तींचा उपहास केलेला असला तरी त्याला कुचष्टेचा दंशसुद्धा झालेला नाही. कधी कधी इंगळयांची कविता बोजड झाल्यासारखी वाटते. प्रतिमांच्या हव्यासामुळे सामाजिक आशय त्यांच्या मागे दडपल्या जातो. त्यामुळे ही क्लिष्टता आली असावी असे वाटते.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त (दि. १६ मार्च १९७७ ते १५ मे १९७७)

गो. स. देहाडराय, सरचिटणीस

१. **कार्यालय व्यवस्थापन :**

१.१ कार्यकारी मंडळाची २० वी सभा (१९७६–७७ ची सहावी सभा) दि. २९–३–७७ ला सकाळी ९ वाजता केंद्रीय कार्यालयात भरली. सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. रा. श्री. जोग आणि वि. सा. संघाचे आजीव सदस्य रा. मा. हजरनवीस व गो. आ. भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नंतर सभेचे कामकाज करणे अशक्य झाले, त्याविषयी सविस्तर अधिकृत वृत्तांत वर्तमान पत्रात देण्यात आला आहे.

१.२ नव्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा दि. २.५.७७ ला सायंकाळी ६ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरली. या सभेत निर्वाचन अधिकारी अॅ. पां. वा. गडकरी, उपनिर्वाचन अधिकारी श्री. मधुकर राजे व लवाद अॅड. हृ. ना. वैद्य यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या कार्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. नंतर नवीन कार्यकारी मंडळाच्या सभासदांतून पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची नावे अन्यत्र दिलेली आहेत. ब्रह्मपुरी शाखासभेला मान्यता देण्यांत आली. सभेच्या सुरवातीला सर्व सभासदांनी संघाशी एकनिष्ठ राहण्याबद्दल शपथ घेऊन नवीन प्रथा सुरू केली. शपथ खालीलप्रमाणे :

'विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीचा सदस्य म्हणून मी शपथ घेतो की संघाच्या प्रतिष्ठेला व सन्मानाला धक्का लागेल असे कुठेहि व केव्हाहि बोलणार नाही व वागणार नाही. संघाची घटना, नियम व त्या द्वारा निर्माण केलेली पदे ह्यांचा मी सन्मान राखेन. संघाच्या हितापुढे मी स्वतःचा स्वार्थ दूर ठेवीन व सर्व संमतीने व सहकार्याने काम करेन.'

१.३ **नवीन आजीव सभासद :**

१ श्री. वाघमारे, सूर्यभान सीताराम, नागपूर.

२ प्रा. देशमुख, गुलाम मुस्तफा अ० अझिझ, चिखली.

३ प्रा. चांदुरकर, विष्णु उद्धवराव, नागपूर.

४ प्रा. घोरघडे, वामन कृष्णराव, नागपूर.

५ श्री. आगरकर, श्रीराम माधव, नागपूर.

६ प्रा. देशपांडे, शिरीष गोपाळ, नागपूर.

२. **सांस्कृतिक कार्यक्रम :**

२.१ सुप्रसिद्ध कवी राजा बढे यांच्या दुःखद निधनानिमित्त दि. १३–४–७७ ला सायंकाळी ७ वाजता गडकरी सभागृहात शोकसभा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी संघाध्यक्ष श्री. आ. रा.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥ प्रसिद्ध झाली ॥

मानसी
कवितासंग्रह
वसंत बापट
किंमत पाच रुपये

॥ नव्या आवृत्त्या व पुनर्मुद्रणे ॥

चिं० त्र्यं० खानोलकरलिखित पुस्तके

अजगर
कादंबरी
किंमत दहा रुपये

एक शून्य बाजीराव
नाटक
किंमत आठ रुपये

कालाय तस्मै नमः
नाटक
किंमत सहा रुपये

'गणुराया' आणि 'चानी'
दोन लघुकादंबऱ्या
किंमत सोळा रुपये

जोगवा
कवितासंग्रह
किंमत दहा रुपये

रात्र काळी... घागर काळी
कादंबरी
किंमत तेवीस रुपये

सगेसोयरे
नाटक
किंमत सात रुपये

॥ छापत आहेत ॥

यातनाघर
एकांकिकासंग्रह
महेश एलकुंचवार

जहाज
कथासंग्रह
बाळकृष्ण वि० प्रभुदेसाई

कांटची सौंदर्यमीमांसा
समीक्षा
रा० भा० पाटणकर

॥ आगामी प्रकाशने ॥

रापण
आत्मवृत्त
प्रल्हाद अनंत धोंड

मातृका
कादंबरी
पुरुषोत्तम शिवराम रेगे

डॉ. माधवराव पटवर्धन ऊर्फ माधव जूलियन
चरित्र
द० न० गोखले

ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र
समीक्षा : नवी आवृत्ती
गो० वि० करंदीकर

॥ मौज प्रकाशन गृह ॥ खटाववाडी, मुंबई ४०० ००४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देशपांडे होते. ह्या प्रसंगी डॉ. मधुकर आष्टीकर, डॉ. शकुंतलाबाई खोत व श्री. नाना रेटर यांची भाषणे झाली. अध्यक्षानी ठराव वाचून दाखविला आणि श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

२.२ दि. १४–४–७७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

२.३ दि. २०–४–७७ ला श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. सायंकाळी 'शिवचरित्र' या विषयावर श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या मराठीच्या अभ्यासक विद्यार्थ्यांनी चर्चा केली. या निमित्ताने शिवाजी चरित्राच्या ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

दुसरे दिवशी मधुकर आष्टीकर ह्यांच्या समयोचित प्रास्ताविकानंतर प्रा. सुरेश देशपांडे यांच्या शिवचरित्रपर गीताचे श्री. राजाभाऊ कानगो यांनी गायन केले. साथीला श्री. बक्षी व श्री. सामक होते. श्री. श्रीपाद जोशी आणि उल्हास मनोहर यांचे काव्यवाचनही झाले. श्री. पाठक ह्यांनी चलत्चित्रण केले. सरचिटणीस श्री. गो. स. देहाडराय यांनी आभार प्रदर्शन केले.

२.४ दि. १–५–७७ ला सकाळी ९ वाजता नाना जोग स्मृतिदिनानिमित्त वि. सा. संघाच्या परिसरातील त्यांच्या पुतळ्याला डॉ. मधुकर आष्टीकर यांचे हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

२.५ दि. ५–५–७७ ला सुप्रसिद्ध साहित्यिक व मुस्लीम सत्यशोधक समाजाचे अध्वर्यु श्री. हमीद दलवाई यांच्या निधनानिमित्त शोकसभा आयोजित करण्यात आली. याप्रसंगी श्री. श्रीपाद जोशी यांनी प्रास्ताविक भाषण केले आणि नंतर प्रा. श्रीमती कुसुममाला कोलारकर, तरुणभारताचे संपादक श्री. मा. गो. उपाख्य बाबुराव वैद्य, लोकमतचे संपादक श्री. म. य. उपाख्य बाबासाहेब दळवी, नागपूरचे महापौर श्री. अटलबहादूरसिंग आणि डॉ. मधुकर आष्टीकर यांची भाषणे झाली. अध्यक्षांनी ठराव वाचून दाखविल्यावर श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

३. चित्रकला समिती :

३.१ विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमाने कलाश्रित या संस्थेतर्फे एक चित्रकला प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन दि. २० मार्च ७७ ला डॉ. मधुकर आष्टीकर यानी केले. अध्यक्षस्थानी श्री बापुराव आठवले होते. प्रदर्शन २३ मार्च पर्यंत उघडे होते.

३.२ दि. १४–५–७७ व १५–५–७७ या दोन दिवशी वि. सा. संघाच्या विद्यमाने नागपूर स्कूल ऑफ आर्टस्च्या विद्यार्थ्यांनी चित्रकलाप्रदर्शन आयोजित केले. डॉ. भांजीभाई पाटनकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रा. वसंतराव देहाडराय अध्यक्षस्थानी होते.

३.३ दि. १४–५–७७ ला वि. सा. संघाच्या विद्यमाने कलाश्रित या संस्थेने "चित्ररंग आणि भावतरंग" हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित केला. याप्रसंगी डॉ. मधुकर आष्टीकर, श्री. वसंत चिंचाळकर, श्री. रञ्जन त्रिवेदी, श्री. कमलाकर धारप व प्रा. म. ना. लोही या साहित्यिकांनी त्यानिमित्त आयोजित केलेल्या चित्रकला प्रदर्शनातील चित्रासंबंधी आपल्या भावनात्मक प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

४. सन्मानीयांच्या भेटी :

४.१ दि. १२ एप्रिलला पुणे विद्यापीठाच्या मराठी विषयाचे प्रमुख डॉ. मु श्री. कानडे यांनी वि. सा. संघाला भेट दिली. या प्रसंगी उपस्थितात डॉ. सु. बा. कुळकर्णी व डॉ. द. ह. अग्निहोत्री होते. अनौपचारिक चर्चा झाली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४.२ दिल्लीचे सुप्रसिद्ध वृत्तपत्र वार्ताहर श्री. मोरेश्वर तपस्वी यानी दि. १४–५–७७ ला संघाला भेट दिली. त्यांना संघकार्याचा परिचय करून देण्यात आला.

५. **सत्कार :**

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी श्री. अ. ल. लिमये यांची निवड झाली. त्या निमित्त त्यांचा वि. सा. संघातर्फे दि. ७–५–७७ ला सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. मधुकर आष्टीकर होते. या प्रसंगी श्री. प्रताप लिमसे, श्री. म. य. दळवी, श्री. गो. स. देहाडराय यांची अभिनंदनपर भाषणे झाली.

६. **शाखा सभावृत्त :**

६.१ **यवतमाळ शाखा**

दि. ९–४–७७ ला कै. राजा बढे याना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. ९–४–७७ ला "सौंदर्याची प्रतीति" या विषयावर प्रा. ना. य. कुळकर्णी यांचे भाषण झाले.

दि. १०–४–७७ ला "खोटे बाई आता जा" या नाटकाचा प्रयोग यवतमाळच्या राज्य परिवहन महामंडळाने सादर केला.

दि. १०–४–७७ ला शाखेची सर्व साधारण सभा झाली.

दि. ७–५–७७ ला वि. सा. संघाचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष श्री. ब. ना. एकबोटे यांच्या अभिनंदनासाठी सभा झाली.

६.२ **अमरावती शाखा**

वि. सा. संघाच्या अमरावती शाखा सभेची स्थापना करण्यासाठी अस्थायी समिति नेमण्यात आली. ॲड. बाळासाहेब अनगळ याना समितीचे अध्यक्ष आणि प्रा. मदन भट्ट याना सचिव म्हणून नेमण्यात आले.

इतर शाखांचे कार्यवृत्त हाती आले नाही.

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिति

१. आगामी परीक्षा ३ सप्टेंबर १९७७ ला सुरू होतील.

२. आवेदनपत्रे दि. १५ जुलैपर्यंत कार्यालयात यावीत.

३. ५ जूनपासून शासकीय व साहित्यिक परीक्षांचे वर्ग केंद्रकार्यालयात सुरू होतील.

४. शासकीय व साहित्य पारंगत परीक्षा फक्त नागपूर केंद्रात होतील.

प्रा. माणिक के. वैतुले, परीक्षा संचालक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघ – त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल

विदर्भ साहित्य संघाच्या १९७७ ते १९८० या वर्षाकरिता त्रैवार्षिक निवडणुकीच्या न्यायालयीन आदेशा प्रमाणे, निकालाची अधिकृत घोषणा दि. २८-४-७७ ला निर्वाचन अधिकारी अॅडव्होकेट पा. बा गडकरी यांनी केली. निकाल खालीलप्रमाणे आहे :–

१. अध्यक्ष :

आष्टीकर, डॉ. मधुकर रघुनाथ

(अविरोध निवडून आले असे पूर्वीच घोषित केलेले आहे.)

२. कार्यकारी मंडळाचे निवडून आलेले सोळा सदस्य व त्यांना मिळालेली मते.

१.	प्रभुदेसाई, वि. बा.	५०६
२.	आंबेकर, सौ. कमल श.	४९८
३.	एकवोटे, ब. ना.	४९३
४.	देहाडराय, गो. स.	४९३
५.	फणसाळकर, ज. रा.	४८४
६.	म्हैसाळकर, मनोहर त्र्यंबक	४८४
७.	देशपांडे, शिरीष गोपाळ	४८२
८.	जोशी श्रीपाद भालचंद्र	४७६
९.	धनकर, पु. ह.	४७३
१०.	लिमये, अ. ल.	४७२
११.	बैतुले, माणिक केशवराव	४७१
१२.	मांडवगणे ,पंढरीनाथ द.	४७०
१३.	सरोदे, बजरंग शामराव	४६८
१४.	गेडाम, तुळशीराम विठुजी	४६२
१५.	खेळकर, प्रभाकर भालचंद्र	४५४
१६.	कवडे, शांताराम सीताराम	४४८

३. इतर निवडून न आलेल्या उमेदवारांना मिळालेली मते खालीलप्रमाणे आहेत,

१७.	जागीरदार अरविंद व्यंकटेश	१३५
१८.	मनोहर, यशवंत	७९
१९.	जोग आनंद गणेश	७८
२०.	केळकर, गोपाळ केशवराव	७०
२१.	कुळकर्णी शंकर वामन	५७
२२.	देशपांडे, गणपतराव सदाशिव	५५
२३.	पाठक, मधुसूदन दत्तात्रय	५४
२४.	जानेफळकर, श्रीकृष्ण उर्फ हरिश निळकंठ	४०
२५.	पाटील, सेवकराम	३२

ह्या अधिकृत निकालानंतर सोमवार दि. २-५-७७ ला नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. मधुकर आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली नव्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा झाली. या सभेत खालील पदाधिकारी नियुक्त करण्यात आले.

उपाध्यक्ष–१. श्री. आ. रा. देशपांडे, नागपूर.
२. श्री. ब. ना. एकवोटे, यवतमाळ.

सरचिटणीस–श्री. गो. स. देहाडराय, नागपूर

चिटणीस–१. प्रा. ज. रा. फणसाळकर, नागपूर.
२. श्री. प्र. भा. खेळकर, अकोला.
३. प्रा. शांताराम कवडे, वणी.

कोषाध्यक्ष–श्री. अ. ल. लिमये, नागपूर.

संपादक युगवाणी–डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, नागपूर

संचालक, परीक्षा समिती–प्रा. माणिक केशवराव बैतुले, नागपूर

खालील समित्या नियुक्त करण्यात आल्या.

१ युगवाणी संपादक मंडळ–

१. डॉ. सुरेश म. डोळके
२. प्रा. श्रीधर शनवारे
३. डॉ. सुनील सुभेदार
४. प्रा. बजरंग सरोदे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

५. प्रा. यशवंत मनोहर

६. प्रा. म. बा. कुंडले

सहसंपादक– प्रा. शिरीष गोपाळ देशपांडे (पुढील आदेशापर्यंत अध्यक्षाकडून नामनिर्दिष्ट)

२ परीक्षा समिती–

१. प्रा. पंढरीनाथ द. मांडवगणे अकोला.

२. प्रा. पु. ह. धनकर, चंद्रपूर.

३. डॉ. प्र. दे. कोलते, नागपूर

४. डॉ द. भि. कुळकर्णी,

५. श्री. कृ. मा. चवरे, नागपूर

६. श्री. वि. ब. करगुटकर

३ श्री. शिवाजी संदर्भ ग्रंथालय समिती–

आमंत्रक– श्री. अ. ल. लिमये

सभासद– श्री. चंद्रकांत कुळकर्णी

श्री. राजशेखर बालेकर

श्री. अरविंद सावदेकर

४ अर्थ समिती–

आमंत्रक–प्रा. ज. रा. फणसाळकर

सभासद–१. श्री. मारोतराव दत्ताजी, धनवट

२. श्री. जयंत वामनराव चितळे

३. श्री. गोपाळराव पाठक

४. श्री. श्रीधर जयकृष्ण दामले.

अध्यक्षांच्या पुढील आदेशापर्यंत खालील अस्थायी समित्या नियुक्त करण्यांत आल्या.

१. नाट्य समिती–

आमंत्रक–श्री. मनोहर म्हैसाळकर आणि सौ. कमल आंबेकर

सभासद–१. श्री. मदन गडकरी.

२. श्री. महेश पातुरकर

३. श्री. शाम बंड

४. श्री. गणेश नायडू

५. श्री. गजानन पांड

६. श्री. मधुसुदन गोविंद वेलणकर

२. सांस्कृतिक समिती–

(चित्रकला /संगीत /साहित्य)

आमंत्रक–श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी

सभासद–१. सौ. सुलभा हेर्लेकर

२. श्री. योगेश बऱ्हाणपुरे

३. श्री. सुभाष चांदुरकर

४. श्री. अनिलकुमार आदेवार

५. श्री. भाऊ पंचभाई

६. श्री. कमलाकर धारप

३. धनवटे रंग मंदिर (अस्थायी व्यवस्थापन)

श्री. मनोहर म्हैसाळकर

श्री. अ. ल. लिमये.

४. प्रसिद्धी प्रमुख–श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी

५. जनसंपर्काधिकारी–प्रा. ज. रा. फणसाळकर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साभार पोच

(१६-३-७७ ते १५-५-७७ पर्यंत युगवाणीला भेटीदाखल आलेली पुस्तके.)

(कंसातील आकडे पृष्ठाकांचे आहेत).

मॅजेस्टिक प्रकाशन, ३१६, प्रसाद चेंबर्स, मुंबई ४

पशु, पक्षी, कीटक : सुभाष भांडारकर, रु. ४, (६५)

प्रसन्न कुमार सौ. मालती दांडेकर, रु. ७, (१३१)

बाल बहादूर : कॅप्टन राजा लिमये, रु. ६, (१२३)

नोकरी कशी मिळवावी आणि टिकवावी
पु. शं. पतके, रु. ३, (६७)

मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव नाका, मुंबई, ४

चौफुला : विद्याधर पुंडलीक, रु. ५, (७६)

श्री गाडगे महाराज : गो. नी. दांडेकर, रु. २०, (३०४)

साहित्य : रूप आणि गंध :
व. दि. कुळकर्णी रु. १२, ५० (१४७)

नागीण चारुता सागर, रु. १६ (१६५)

तीन एकांकिका : रमेश पवार, रु. ५ (५०)

ह. ना. आपटे यांचे कादंबरी-तंत्र
कृ. रा. सावंत, रु. १५ (१६४)

रघुनाथाची बखर : श्री. ज. जोशी, रु. ४० (५०७)

आनंदी गोपाळ : राम जोगळेकर, रु. ८ (१०२)

पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी, ताडदेव रोड, मुंबई, ३४

जाहीर नामा : नारायण सुर्वे, रु. ६, (७२)

हजार हातांचा आक्टोपस :
सुधीर बेडेकर, रु. १२ (१४९)

गुड बाय् डॉक्टर मधुकर तोरडमल, रु. ६ (८८)

विजय प्रकाशन, हनुमान गल्ली, सीताबर्डी, नागपुर १२

विद्रोहाचे पाणी पेटले आहे
गंगाधर पानतावणे रु. १२ (१७१)

अनिकेत : सौ. मंगला साठे, रु. १६ (२३०)

अशीच राहू दे मला
सौ. सुमन भडभडे, रु. १४ (१७१)

बातचीत भास्कर नंदनवार, रु. १० (१०१)

सैन्यातल्या सावल्या
ले. कर्नल भा. श्यं. परांजपे, रु. १४ (१४१)

तिसऱ्यांदा रणांगण :
डॉ. द. भि. कुळकर्णी रु. १६ (१६४)

जेव्हा मला विंचू चावला
प्रा. मधुकर आष्टीकर, रु. १ (२६)

आयडिया मास्टर माधवराव यादव, रु. ८ (११२)

सासुरवास : राम काळे, रु. ७, (१०९)

कलंक मुक्ती निशिकांत गेंडे, रु. १० (१२०)

हद्दपार : मधुकर पाठक, रु. ८ (१०३)

प्रीत आणि विषमंथन
प्रभाकर अत्रे, रु. १० (१३४)

इतर प्रकाशने :

आनंदाचा डोह : रा. ग. जाधव, प्राज्ञ
पाठशाळा मंडळ प्रकाशन, रु. ८ (१२६)

प्रवास आणि नि : श्वास :
भास्कर गोळे, वहिनी प्रकाशन, पुणे, ३०
रु. ५ (८०)

शतरूपा : राजीव, देवदत्त प्रकाशन सोलापूर,
रु. ८ (१०३)

स्त्रोत अनंत कदम, अकेडेमिक असो
प्रकाशन, रु. ८, (९५)

अभिरुची ग्रामीण व नागर : अ. भा. मराठी साहित्य
संमेलन ५१ वे अधिवेशन, कऱ्हाड. रु. १२ (२०७)

स्वातंत्र्य मंत्र : संपादक ह. बा. कुळकर्णी,
मूल्य नाही (६०)

गाभाऱ्यातली माणसं : गिरिजा कीर, रु. १२ (२४८)

प्र. के. अत्रे : साहित्य आणि समीक्षा : रु. ३०, (५०८)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी – वर्ष ३२

एप्रिल १९७६ ते मार्च १९७७

लेखकांची सूची

[शेवटचा क्रमांक पृष्ठाचा आहे.]

कविता

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथा

नाटिका–एकांकिका

लेख

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समीक्षा - परीक्षणे - परामर्श

साहित्याची सूची

कविता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथा

नाटिका–एकांकिका

लेख

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

समीक्षा परीक्षणे परामर्श

मुखपृष्ठ–छायाचित्रे

संपादकीय

कार्यवृत्त

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० (अ) प्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या सभासदांना सूचना देण्यात येते की, विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दि. २४ जुलै १९७७ ला दुपारी ४ वाजता नागपूर येथे केंद्रीय कार्यालयात भरेल

सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक साधारण सभेचा अहवाल
२. गत वर्षाचे कार्यवृत्त.
३. १९७६-७७ सालचे हिशेब तपासनीसाकडून तपासून घेतलेले हिशेब.
४. पुढील (१९७७-७८) वर्षाचे अंदाजपत्रक.
५. १९७७-७८ करिता अधिकृत (चार्टर्ड) हिशेब तपासनीसाची नेमणूक.
६. अध्यक्षांच्या अनुमतीने येणारे अन्य विषय.

गणपूर्तीच्या अभावी सभा स्थगित झाल्यास ती सभेच्या वेळेनंतर त्याच दिवशी व त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व तिला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी चार दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.


ह्या सभेला सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती.

विशेष सूचना :- घटना कलम ९ (इ) अन्वये सभासद होऊन बारा महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.


नागपूर
दि. ३१-५-७७

गो. स. देहाडराय
सरचिटणीस

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमाने ५ साहित्यकार आणि १० चित्रकार ह्यांचा "चित्ररंग भावतरंग" हा अभिनव मेळ – कलाश्रित. डावीकडून उजवीकडे– श्री. रञ्जन त्रिवेदी, मोरघडे, डॉ. आष्टीकर (अध्यक्ष, वि. सा. संघ)



वि. सा. संघाच्या विद्यमाने प्रा. गो. कृ. देशपांडे ह्यांच्या चित्रकलेचे प्रदर्शन – कलाश्रित. डावीकडून उजवीकडे – डॉ. आष्टीकर, मोरघडे व श्री. आठवले.

प्रकाशक : गो. स. देहाडराय, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२
मुद्रक : श्या. श्री. बनहट्टी, श्रीनिवास मुद्रणालय, सुविचार प्रकाशन इमारत, धनतोली, नागपूर १२

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका